७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. १५ जून २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# शंभरावे मराठी साहित्य संमेलन पुण्यात

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात होणार सोहळा




**मुंबई (दै. संध्या)**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ऐतिहासिक शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रांगणात दि. २८ ते ३१ जानेवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. हे संमेलन चार दिवसांचे असून ते ऐतिहासिक आणि भव्य स्वरूपात पार पडेल, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी आज (दि. १४) पत्रकार परिषदेत दिली. संमेलनाचे संयोजक, समर्थ युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, मसापाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर उपस्थित होते.

महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक रविवारी पुण्यात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संमेलनाचे स्थळ आणि तारखा याबाबत सर्व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. यापूर्वी दि. १३ जून रोजी स्थळ निवड समितीने एस.पी. महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय आणि पुणे विद्यापीठ परिसराची पाहणी केली होती.

या पाहणीमध्ये योगेश सोमण, उपाध्यक्ष पुरुषोत्तम सप्रे, कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, डॉ. रामचंद्र काळुंखे, प्रा. प्रतिभा सराफ आणि लखनसिंह कटरे सहभागी झाले होते. बैठकीत विविध पैलूंवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संमेलनासाठी आवश्यक असलेले भव्य प्रांगण, प्रशस्त पार्किंग व्यवस्था तसेच विद्यापीठातील सुमारे दीड हजार प्राध्यापक व कर्मचारी संमेलनाच्या यशासाठी सहकार्य करतील, अशी ग्वाही कुलगुरू सुरेश गोसावी यांनी दिल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

या सर्व बाबींचा विचार करून शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

रविवारी झालेल्या बैठकीस ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्यासह महामंडळाचे सर्व सभासद उपस्थित होते.

> नांदी शंभराव्या साहित्य संमेलानाची या उपक्रमातून पुणे, मुंबई वगळता जेथे साहित्य संमेलने झाली आहेत, अशा महाराष्ट्रातील ४८ ठिकाणांसह महाराष्ट्राच्या विविध भागात संमेलनपूर्व ९९ साहित्यिक उपक्रमांद्वारे शंभराव्या साहित्य संमेलनाची नांदी होणार आहे. १५ ऑगस्ट ते १५ जानेवारी या कालावधीत हे साहित्यिक उपक्रम राबविले जाणार आहेत.

> **९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे १ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आले होते. हे संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाहूपुरी शाखा आणि मावळा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. संमेलनाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी अध्यक्षपद भूषविले. साताऱ्यात हे संमेलन तब्बल ३२ वर्षांनंतर भरले. सातारा शहरात झालेले हे चौथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होते.**



> प्रत्यक्ष कर्जमाफ होण्याऐवजी शेतकऱ्यांच्या खिशातूनच पैसे काढून घेतले जात आहेत. ही अत्यंत क्लेशदायक बाब असून प्रत्यक्षात बँकांचे कर्ज माफ होताना कुठेही दिसत नसल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला.

## EVM मशिन्स जाळल्या : नाना पटोलेंचा खळबळजनक आरोप

**मुंबई (दै. संध्या)**

पश्चिम बंगालमध्ये निवडणूक आयोगापासून ते संपूर्ण निवडणूक मॅनेजमेंट आणि 'मॅच फिक्सिंग' हे भाजपच्या बाजूनं करण्याचा प्रयत्न झाला. हे चित्र संपूर्ण देश आणि पश्चिम बंगालची जनता उघड्या डोळ्यांनी पाहत होती. हे संपूर्ण प्रकरण आता सुप्रीम कोर्टापर्यंत पोहोचले आहे. ईव्हीएम मशीनमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार आणि गडबड करण्यात आल्याचा आरोप पटोले यांनी केला. ही बाब आता लोकांसमोर उघड होत आहे, हे समजताच पश्चिम बंगालमधील पराभवाच्या छायेखाली असलेल्या भाजप सरकारनं ईव्हीएम मशिन्सच जाळून टाकल्याचा दावा त्यांनी केला आहे. हा घातपात मुद्दाम घडवून आणला गेल्याचे त्यांनी म्हटलं आहे.

भाजपच्या 2014 ते 2019 या काळातील फडणवीस सरकारनं 2016 मध्ये जाहीर केलेली कर्जमाफी ही निव्वळ फसवणूक होती, असा घणाघाती आरोप काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केलाय. सरकार बदलले तरी अजूनही शेतकऱ्यांची कर्जमाफी पूर्ण झालेली नाही, असे सांगत त्यांनी सध्याच्या सरकारच्या धोरणांवरही कडाडून टीका केली. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांना घेऊन रोहित पवार यांचं पंढरपूरमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा असल्याची माहिती नाना पटोलेंनी दिली. शेतकऱ्यांकडून जबरदस्तीनं आधी एवढे पैसे भरा, मगच तुमची कर्जमाफी होईल अशा अटी घातल्या जात आहेत.

## उपोषण लय बेकार, हाडं ठिसूळ होतात

### चर्चेला बोलावल्यास मार्ग काढावा

**सोलापूर (दै. संध्या)**

राज्यातील शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी आणि 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'तील जाचक अटी रद्द करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपुरात पुकारलेल्या 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी रोहित पवार यांच्या आंदोलनस्थळी भेट दिली. तसेच रोहित पवारांसोबत त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर चर्चा देखील केली. सरकार शेतकऱ्यांचा आकडा हळू हळू कमी करत असल्याची माहिती पवारांनी जरांगे यांना दिली.

यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, या देशातल्या, या राज्यातल्या बळीराजासाठी आपल्या पांडुरंगाच्या नगरीत संघर्ष सुरू आहे. नक्कीच शेतकऱ्याला न्याय तर मिळालाच पाहिजे. शेतकरी राजा आपला एकवटला आहे. कारण शेतकरी वाचला तर आपण वाचणार आहोत. आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद आहे फक्त थोडा घोळ आहे. तुम्ही कितीही पोटतिडकीने केले तरी त्याला राजकारणच म्हटले जाणार आहे. तुम्ही आमच्या पार्टीत या, असेही जरांगे यांनी रोहित पवारांना म्हटले. पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, तुमच्या मागण्या किती मान्य केल्या जातील माहीत नाही. पण शेतकाऱ्यांची लढाई म्हणून याकडे आपण पाहिले पाहिजे. आपण राजकारण करत नसून शेतकऱ्यांसाठी रोहित पवार लढत आहेत. आता मी इथून गेलो की मला म्हणतील मी पवारांचा माणूस आहे. परवा दिवशी रातभर मी देवेंद्र फडणवीसांचा माणूस होतो. आता तिथून सुटून तुमच्या गळ्यात गुतणार आहे. माझी खूप फरफट सुरू आहे. पण माझी एक भूमिका असते जिथे जिथे अन्याय होत असतो तिथे आम्ही जात असतो. बच्चू भाऊ बसले होते तेव्हा देखील आम्ही गेलो होतो. शेतकऱ्यांसाठी आम्ही कायम सोबत आहोत.



■ मनोज जरांगेंचा रोहित पवारांना मोलाचा सल्ला

# रोहित पवारांचं आंदोलन मनोज जरांगे स्टाईल अन् नौटंकी

## भाजप आमदाराची टीका, अन्नत्याग उपोषणाची उडवली खिल्ली



**मुंबई (दै. संध्या)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा आमदार रोहित पवार यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केलं आहे. शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी काढून सरसकट कर्जमाफी करावी, ही मागणी घेऊन गेल्या दोन दिवसांपासून ते पंढरपुरात आंदोलनावर बसले आहेत. त्यांच्या या आंदोलनास विविध शेतकरी संघटनांनी आणि विरोधी पक्षातील काही नेत्यांनी पाठिंबा दिला आहे. तर, सत्ताधारी पक्षाचे नेते, आमदार रोहित पवारांचे आंदोलन ही निव्वळ नौटंकी असल्याची टीका करत आहेत. आमदार सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर यांच्यानंतर आता भाजप आमदार परिणय फुकेंनीही रोहित पवारांचे आंदोलन जरांगे पाटील स्टाईल नौटंकी असल्याचं म्हटलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी कर्जमाफीच्या जाचक अटी रद्द कराव्यात या मागणीसाठी सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन म्हणजे केवळ 'मनोज जरांगे पाटलांची स्टाईल मारण्याचा' आणि 'नौटंकी' करण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका भारतीय जनता पार्टीचे विधानपरिषदेचे आमदार डॉ. परिणय फुके यांनी केली आहे. विशेष म्हणजे जरांगे पाटील समर्थकांकडून या आंदोलनास पाठिंबा देण्यात आला आहे.

आमदार परिणय फुके यांनी रोहित पवारांच्या या आंदोलनावर टीका करताना म्हटले की, रोहित पवार जे उपोषणाला बसले आहेत, ते शेतकऱ्यांच्या भल्यासाठी किंवा त्यांच्या कोणत्याही खऱ्या प्रश्नांसाठी नाही. त्यांनी जे 'अन्नत्याग आंदोलन' सुरू केले आहे, त्याऐवजी त्यांनी आता 'मीडिया त्याग आंदोलन' करायला हवे, असा खोचक सल्लाही फुकेंनी दिला.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाचे खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असून ते शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी बोलावलेल्या तातडीच्या आणि महत्त्वाच्या बैठकीवर भाजपा आमदार डॉ. परिणय फुके यांनी जोरदार निशाणा साधला. "पूर्वी ज्याप्रमाणे आमदारांनी उठाव केला, तसाच उठाव आता खासदारही करतील या भीतीनेच उद्धव ठाकरे आपल्या खासदारांची चाचपणी आणि मोजणी करत आहेत," असे त्यांनी म्हटले.

### जरांगे पाटील पंढरपुरात

> रोहित पवारांचे पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन सुरू असताना जरांगे पाटील पंढरपूर दौऱ्यावर आहेत. मनोज जरांगे यांच्या समर्थकांकडून आमदार रोहित पवारांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला आहे. त्यामुळे, जरांगे पाटील रोहित पवारांची भेट घेणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याशिवाय विविध पक्षांचे नेते आमदार खासदारही दिवसभर रोहित पवार यांच्या भेटीस येण्याची शक्यता आहे. सरकारकडून आंदोलन थांबवण्याचा प्रयत्न सुरूच असून सध्या दत्तात्रय भरणे आणि सहकार मंत्री दोघे रोहित पवार यांच्या संपर्कात असल्याचं सांगण्यात येत आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## दिंडोरीतील विहिरीत वाहन पडून ९ जण तर माळशिरसमध्ये ८ मृत्युमुखी; मोहिते पाटलांकडून संताप

# अपघात 'हॉटस्पॉट'वर सरकार लक्ष देणार का?



**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील अपघातांची मालिका सुरूच असून दररोज भीषण दुर्घटनेच्या घटना समोर येत आहेत. त्यामुळे, रस्ते आणि अपघात हॉट पॉइंटचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यातच, सोलापूरच्या माळशिरस मधील अपघाताची घटना दोन महिन्यांपूर्वीच्या दिंडोरी अपघाताच्या घटनेची आठवण करुन देणारी आहे. माळशिरस येथील तांदुळवाडी गावाजवळील एका विहिरीत भाविकांचे पिकअप वाहन कोसळून 8 जणांचा मृत्यू झाला. स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतल्याने 5 जणांना वाचविण्यात आलं आहे. मात्र, दोनच महिन्यांपूर्वी नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी येथे रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीत कार कोसळून 9 जणांचा मृत्यू झाला होता. सोलापूर जिल्ह्याच्या म्हसवड येथील सिद्धनाथाच्या दर्शनासाठी आलेले भाविक देवदर्शनाहून परतत असताना तांदुळवाडी परिसरातील विहिरीत त्यांचे पिकअप वाहन पडले. या वाहनातून रांजणी गावातील 14 भाविक प्रवास करत होते, त्यापैकी 8 जणांचा मृत्यू झाला असून 6 जणांना वाचविण्यात स्थानिकांना यश आलं. घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. तर, पोलीस प्रशासन, अग्निशमन दलानेही घटनास्थळी धाव घेतली. या घटनेनंतर जिल्हाधिकाऱ्यांपासून ते राजकीय नेत्यांची धावपळ आणि यंत्रणा हलली. मात्र, येथील रस्त्याबाबत, विहिरीताबाबत तक्रारी करुन देखील कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. त्यामुळे, शासनाला किंवा प्रशासनाला केवळ लोकांचे जीव गेल्यावरच जाग येते का असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. दिंडोरीतील जवळपास 100 फूट मोठ्या काँक्रिटच्या रस्त्याच्या मधोमध विहीर होती, तिला कठडा किंवा सुरक्षासंबंधित कोणतीही व्यवस्था नव्हती. त्यामुळेच, तेथे रात्रीच्या सुमारास अपघात 9 जणांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना 2 एप्रिल 2026 रोजी घडली होती. त्यानंतर, मुख्यमंत्री, संबंधित मंत्र्यांनीही दुर्घटनेची दखल घेत चौकशीचे आदेश दिले. मात्र, राज्यातील इतर अपघात हॉट पॉईंटचं काय, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. प्रत्येक जिल्ह्यातील प्रशासन, तत्सम अधिकारी तक्रारींची दखल का घेत नाहीत, असा प्रश्न सर्वसामान्य विचारत आहेत. माळशिरसच्या तांदुळवाडी परिसरातील विहिरीत पिकअप वाहन कोसळून झालेल्या अपघाताच्या धोकादायक स्पॉटबाबतही येथील ग्रामस्थ सर्जेराव चव्हाण यांनी तक्रार दिली होती, या धोकादायक विहिरीमुळे अपघाताची शक्यता वर्तवत त्यांनी तक्रार दिली होती. मात्र, त्यांच्या तक्रारीनंतरही कुठलीही उपाययोजना किंवा दखल शासन-प्रशासन स्तरावरुन घेण्यात आली नाही. त्यामुळेच, पुन्हा एकदा अपघाताला निमंत्रण देत 8 निष्पाप नागरिकांचा जीव गेलाय.

या भागात अनेक ठिकाणी असे धोकादायक स्पॉट आहेत, चार-चार वर्षे झाले तरीही कामं होत नाहीत. आम्ही अनेक पत्रव्यवहार केले, बैठका घेतल्या तरीही कुठलीही प्रगती दिसून येत नाही. सुरक्षेच्या ज्या काही उपाययोजना करायला पाहिजे त्या कुठल्याही करण्यात आल्या नाहीत. दरमहिन्याला एक अपघात होतो, वारंवार पत्रव्यवहार करुनही शासन दुर्लक्ष करतं. आम्ही मंत्रालयीन स्तरावर, प्रशासकीय स्तरावर फॉलोअप घेतला, पण लोकांचे जीव गेले तरीही कुणालाच काही फरक पडत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली. त्यावरुन, सरकारी यंत्रणा किती ढिसाळ आणि बेजबाबदार असल्याचं दिसून येत आहे. दिंडोरीतील अपघातप्रकरणी विहीरीचे मालक ॲड. विक्रम राजे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## संपादकीय

# गृहिणींना पगार देणार का?

खासदार सरोज खापर्डे यांनी गृहिणींना घरगुती कामातून सक्तीचे साप्ताहिक सुट्टी देणारे विधेयक राज्यसभेत १९९६ मध्ये मांडले होते. पण भारतीय घरांमध्ये त्याची अंमलबजावणी अशक्य मानल्यामुळे ते मंजूर झाले नाही ,या विधेयकाची चेष्टाही खूप झाली. गृहिणी आरामखुर्चीत वाचत बसली आहे, बिचारा नवरा घराच्या मध्यभागी गोंधळून उभा आहे, दूध उतू जात आहे, छोटे मुल रडत आहे, असे कार्टून आर. के. लक्ष्मण यांनी काढले होते. महिलांनीही साप्ताहिक सुट्टी घेऊन दुसऱ्या दिवशी आम्हाला डबल काम करायचे नाही, असे म्हणत विधेयकाकडे पाठ फिरवली. न्या. संजय करोल व न्या. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठाने परत एकदा या प्रश्नाला एका केसच्या निमित्ताने वाचा फोडली आहे. गृहिणी घरासाठी राबते, सर्वात आधी ती उठते व सगळे झोपल्यानंतर झोपते, दिवसभर ती करत असलेल्या कामात स्वयंपाक, भांडी, केरवारे घर नेटके ठेवणे, कपडे मशीनला लावणे, इस्त्री करणे अशा अनेक कामांचा समावेश आहे, आजच्या शिक्षित गृहिणीला मुलांना शाळेला पोहोचवणे, आणणे त्यांचा अभ्यास घेणे, बँकांची कामेही करावी लागतात. याशिवाय घरी येणारे पाहुणे, ज्येष्ठ नागरिक, घरातल्यांची आजारपणे अशी अतिरिक्त कामेही ती करते, या सर्व कामात व्यवस्थापन, नियोजन, बचत अशी सर्व कौशल्ये आहेत. पण या कामाचा मोबदला तिला मिळत नाही. गृहिणी घरासाठी अविरत राबत असते. एखादा कामगार कंपनीत गेला नाही तर कारखाना बंद होत नाही. पण, गृहिणीने सुट्टी घेतली तर सर्व घर ठप्प होते. गृहिणी कधीही स्वयंपाकाचे एवढे पैसे द्या, इस्त्रीचे एवढे पैसे द्या, असे मागत नाही. तिने दुपारी विश्रांती घेतली तर दिवसभर काय झोपा काढत होती, म्हणून तिला हिणवले जाते. गृहिणीचे काम हे बायकी काम व ज्याला बुद्धी लागत नाही, असे मानले जाते. माझ्या महाविद्यालयात आईने रविवारी सुट्टी घेतली तर काय कराल? असे मी विद्यार्थ्यांना विचारले तर त्यांच्याकडे उत्तर नव्हते, एक विद्यार्थी उत्साहाने आम्ही हॉटेलमध्ये जेवायला जाऊ व आईलाही बरोबर घेऊन जाऊ असं म्हणाला. तेव्हा समाजातील गृहिणींबद्दलच्या मानसिकतेची मला चिंता वाटली, आईला इतके गृहित धरायचे की तिला बरोबर जेवायला घेऊन जाणे म्हणजे तिच्यावर उपकारच करत असल्याची भावना व्यक्त होते. सर्वोच्च न्यायालयाने गृहिणीला 'नेशन बिल्डर' म्हटले, गृहिणीच्या कामाचा मोबदला तीस हजार रुपये सांगितला, तिच्या घरातील कामाला कमी लेखू नये किंवा प्रतिकात्मक मानू नये, असा इशाराही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. महात्मा फुलेंनी शिक्षणाविषयी बोलताना म्हटले होते, 'एक पुरुष शिकला तर तो एकटाच शिकतो पण महिला शिकली तर अख्खं घर शिकून शहाणे होते.' हे खरे आहे. सर्वोच्च न्यायालयाने गृहिणीला 'नेशन बिल्डर' म्हणताना गृहिणी कुटुंबाचा पाया मजबूत करते, पुढची पिढी घडवते, समाजाच्या विकासात तिचे योगदान महत्त्वाचे आहे, असेही म्हटले आहे. आजही घरकाम हे गृहिणीचेच मानले जाते. आठ तास नोकरी करून आल्यावरही पदर खोचून त्या किचन कामात जुंपून घेतात. आता यात काही प्रमाणात बदल होत आहेत. दमून आलेल्या पत्नीला चहा देणे, कुकर लावणे, ही कामे पुरुष करत आहेत. पण इच्छा नसल्यास ही कामे ते टाळूही शकतात. महिलेला घरातील सर्व कामे पूर्ण करावीच लागतात. सध्याची कुटुंबव्यवस्था ही पुरुषांसाठी हितकारक असल्याने त्यातले फायदे पुरुष वर्गाला गमवायचे नाहीत. गृहिणीने घरातील कामाचे विभाजन केले पाहिजे, पण तीही याच समाजरचनेचा घटक असल्याने मुलीला सर्व कामे शिकवते व तिला ती करायला लावते. मुलगा मात्र 'बॉईज डोन्ट वर्क' म्हणत वडिलांचे अनुकरण करत बाईला कामे सांगत राहतो. पुरुषांनी पाणी भरणे, भाजी आणणे अशी कामे केली तर महिलांनी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. अन्यथा पुरुषांना पळवाट काढायला संधी मिळते. पुरुषांनाही घरकाम शिकवले व सांगितले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने गृहिणीसाठी काही मार्गदर्शक तत्वेही जारी केली आहेत. गृहिणीच्या कामाची दखल घेताना तिच्या मोबदल्याचे मूल्यांकन करावे. त्यासाठी तिचे वय, शिक्षण, कौशल्ये, कौटुंबिक जबाबदाऱ्या, आर्थिक परिस्थिती या साऱ्याचा विचार केला जावा, असे न्यायालयाने म्हटले आहे.

## संस्कृत सुभाषित

आलसस्य कुतो विद्या अविद्यस्य कुतः धनम्।
अधनस्य कुतो मित्रं अमित्रस्य कुतः सुखम्।।
अर्थ – आळशी माणसाला विद्या कुठून मिळणार? विद्याहीनाला धन कुठून मिळणार? धनहीनाला मित्र कुठून प्राप्त होणार? आणि ज्याला मित्रच नाहीत त्याला सुख तरी कुठून मिळणार?

## आगामी साप्ताहिकी

१५ जून २०२६ सोमवार
अधिक ज्येष्ठ अमवास्या – निज ज्येष्ठ
आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन
सोमवती अमावस्या सकाळी ०८.२४ पर्यंत
पुरुषोत्तम – मल – अधिक ज्येष्ठ मास समाप्ती
सकाळी ८.२४
निज ज्येष्ठ मासारंभ सकाळी ८.२४ नंतर
अमावास्या समाप्ती ८.२४

१६ जून २०२६ मंगळवार
चंद्रदर्शन

१७ जून २०२६ बुधवार
महाराणा प्रताप जयंती (तिथीप्रमाणे)
गोपाळ गणेश आगरकर पुण्यतिथी
राजमाता जिजाऊ साहेब भोंसले पुण्यतिथी (तारेखप्रमाणे)
रंभाव्रत
झाशीची रानी लक्ष्मीबाई पुण्यतिथी (तारेखप्रमाणे)
मुस्लिम नूतन वर्षारंभ
हिजरी सन १४४८ प्रारंभ
मुस्लिम मोहरम मासारंभ

१८ जून २०२६ गुरुवार
विनायक चतुर्थी
गुरू अर्जुन देव शहीद दिन
गुरुपुष्यामृतयोग
सकाळी ६.०४ पासून सकाळी ११.३२ पर्यत

१९ ऑगस्ट २०२६ शुक्रवार

२० जून २०२६ शनिवार
अरण्यषष्ठी
विंध्यवासिनी पूजा
चांगदेव महाराज यात्रा – पुणतांबे
उद्धव महाराज मुंगळेकर पुण्यतिथी – बिलोली, नांदेड

२१ जून २०२६ रविवार
भानुसप्तमी
आंतराष्ट्रीय योग दिन
झाशीची रानी लक्ष्मीबाई पुण्यतिथी (तिथीप्रमाणे)
दक्षिणयनारंभ
कोलबास्वामी
जयंती व पुण्यतिथी – धापेवाडा (नागपूर)

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 9 | | 3 | 4 | | |
| | 8 | 6 | 1 | | 4 | | 7 | 9 |
| 9 | | | | | | 1 | 2 | |
| | | | 7 | 8 | 6 | | | 2 |
| | | 3 | | | | 7 | | |
| 4 | | | 2 | 3 | 5 | | | |
| | 4 | 1 | | | | | | 7 |
| 5 | 7 | | 6 | | 8 | 2 | 3 | |
| | | 8 | 5 | | 1 | 6 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९८० चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 2 | 9 | 5 | 3 | 4 | 8 | 6 |
| 3 | 8 | 6 | 1 | 2 | 4 | 5 | 7 | 9 |
| 9 | 5 | 4 | 8 | 6 | 7 | 1 | 2 | 3 |
| 1 | 9 | 5 | 7 | 8 | 6 | 3 | 4 | 2 |
| 8 | 2 | 3 | 4 | 1 | 9 | 7 | 6 | 5 |
| 4 | 6 | 7 | 2 | 3 | 5 | 9 | 1 | 8 |
| 6 | 4 | 1 | 3 | 9 | 2 | 8 | 5 | 7 |
| 5 | 7 | 9 | 6 | 4 | 8 | 2 | 3 | 1 |
| 2 | 3 | 8 | 5 | 7 | 1 | 6 | 9 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- २००५ – असाफा पॉवेल १०० मीटर अंतर ९.७७ मिनिटांत धावला. जागतिक विक्रम ठरला.
- २००६ – श्रीलंकेत झालेल्या भू सुरुंग स्फोटात बसमधील ६० हून अधिक प्रवासी ठार झाले.
- २००६ – पेरुत बस दरीत कोसळून २८ कामगार ठार झाले.
- २००७ – सलाम फयाद पॅलेस्टिनचे नवीन पंतप्रधान बनले.

### राष्ट्रीय

- १८६९ – महाराष्ट्रातील पहिला विधवा विवाह पार पडला. पांडुरंग विनायक करमरकर यांनी वेणूताईच्या गळ्यात माळ घातली.
- २००८ – १०८ वर्षाचा विक्रम मोडत मान्सून निर्धारित वेळेपेक्षा पंधरवाड्यापूर्वीच दिल्लीत दाखल झाला.

### जन्म

- १८९८ – शिक्षणतज्ज्ञ आणि गीतेचे अभ्यासक डॉ. ग. श्री. खरे यांचा जन्म.
- १९२९ – ज्येष्ठ अभिनेत्री आणि गायिका सुरैय्या यांचा जन्म.
- १९३८ – प्रसिद्ध समाजसेवक अण्णा हजारे यांचा जन्म

### निधन

- १९३१ – संदेशकार अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे निधन.
- १९७१ – अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेते वेंडेल मेरेडिथ स्टॅनले यांचे निधन.

## : SMS :

Munna: Bolay to Apun ko tera operation dobara karna paray ga. Kyun k apun kay rubber k gloves teray andar hi reh gaye hain.
Patient: Agar yeh baat hai to mujhay jaanay do. Mien tumharay gloves ki payment kar doon ga.

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर
कौटुंबिक उत्साह, गोड वार्तालाप व आनंदाच्या गाठीभेटी यातून उत्साह संचरेल.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
बोलण्यातील कटुता अहंकाररहित शब्दांनी टाळण्याचा प्रयत्न करा.

**वृषभ :** शुभ रंग : नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम
स्वत:ची तब्येत योग्य साथ देत असेल तर काही नवे संकल्प करणे हितकारक ठरेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
वैवाहिक साथीदाराचा अगदी पत्नीचाही सल्ला अजिबात विसरू नका.

**मिथुन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम
व्यावसायिक प्रश्नामध्ये यश मिळेल. कोणाशीही वादविवाद वाढविणे नुकसानकारक ठरेल.

**धनु :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर
ताणतणावामुळे आजारपण उद्भवणार नाही याची काळजी घेणे.

**कर्क :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम
खाण्यापिण्याची बंधने विसरू नका. कामकाजासंबंधी आपला शब्द प्रमाण मानला जाईल.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम
वेळ देणे अत्यंत हितकारक ठरेल. ठरविलेले कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध रहा.

**सिंह :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
शेजाऱ्याशी संबंध सलोख्याचे होतील. नुसते गप्पाष्टकांत अडकणाऱ्या मैत्रिणीपासून सावध रहा.

**कुंभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
आपले हिशेब चोख ठेवावेत. संशयाला कोठेही जागा राहणार नाही असे बोलणे व कृती ठेवावी.

**कन्या :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : उत्तर
खेळात प्राविण्य मिळेल. लहान लहान कोर्सेस आपले व्यक्तिमत्व फुलविणारे ठरतील.

**मीन :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : दक्षिण
काही सूचक स्वप्ने भविष्याचा कानोसा देणारी ठरतील. परदेश प्रवासाचे स्वप्न पुरे होईल.


## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:नाग ०८:२३:५५ |
| १५ जून २०२६ | करण:किस्तुघ्न |
| सोमवार | १८:२६:२४ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बव २८:३१:०७+ |
| अधिक ज्येष्ठशके | सूर्य:मिथुन १२:४९:३८ |
| संवत्– १९४८ | चन्द्र:मिथुन०८:४०:३० |
| संवत्सर –पराभवनाम | हिजरी सन् – १४४७ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| मास–अधिक ज्येष्ठ | तारीख – २९ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | विशेष |
| कृष्ण पक्ष | अधिक ज्येष्ठ अमवास्या |
| तिथि:अमावस्या | – निज ज्येष्ठ |
| ०८:२३:५५ | आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन |
| ज्येष्ठ (शुद्ध) | सोमवती अमावस्या |
| शुक्ल पक्ष | सकाळी ०८.२४ पर्यंत |
| तिथि:प्रतिपदा | पुरुषोत्तम – मल – |
| २८:३१:०६+ | अधिक ज्येष्ठ मास समाप्ती |
| नक्षत्र:मृगशिर्षा | सकाळी ८.२४ |
| १९:०८:११ | निज ज्येष्ठ मासारंभ |
| योग:शूल ०८:५५:०८ | सकाळी ८.२४ नंतर |
| योग:गण्ड २८:३८:३४+ | अमावास्या समाप्ती ८.२४ |

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.३ | २५.६ |
| अहमदनगर | ३७.७ | २५ |
| अकोला | ४३.६ | ३१.५ |
| अमरावती | ४२.६ | २९.५ |
| बीड | ४५.९ | ३२.१ |
| भंडारा | ४३.६ | ३०.१ |
| बुलढाणा | ३९.५ | २५.६ |
| चंद्रपूर | ४५ | ३२.३ |
| चेन्नई | ४१.७ | ३१.८ |
| नवी दिल्ली | ३९.६ | २६.२ |
| धुळे | ४२.७ | ३१ |
| गोंदिया | ४१.७ | २९.८ |
| जळगाव | ४३.४ | ३०.२ |
| कोल्हापूर | ३५.७ | २५.५ |
| लातूर | ३८.४ | २६.१ |
| मुंबई | ४०.८ | ३७.७ |
| नागपूर | ४३.१ | २७.६ |
| नांदेड | ४०.७ | २६.८ |
| नंदूरबार | ३८.६ | २७.१ |
| नाशिक | ३७.१ | २६.१ |
| पुणे | ३४.७ | २४.३ |
| पंढरपूर | ४०.४ | २६.९ |
| सातारा | ३६.७ | २५ |
| सांगली | ३७.६ | २५.६ |
| सोलापूर | ४० | २७.३ |
| वर्धा | ४४.५ | ३०.७ |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८१



**आडवे शब्द**
१. नशीबवान
५. उगीच
८. वर-वधूमधील पडदा
१२. वसविलेली वस्ती
१३. केसांची बट
१४. अथवा, किंवा
१५. रक्तवाहिनी
१६. कधी असे, कधी तसे!
१७. पूर्ण बदल
१८. नवीन, अलीकडचा
२०. तीट
२१. टरफल
२२. तोटी
२३. विचित्र
२६. मावा
२७. धवलगिरी
२९. दागदागिने
३२. लिंबू पाण्याचे पेय
३५. शूभ समाचार
३६. दमयंतीचा प्रियकर
३८. एक तारवाद्य
३९. निर्भेळ, चोख सोने
४०. हात
४२. विद्यालय
४३. जन्म देणारी
४४. उत्कर्षाचा काळ
४६. तेजस्वी (डोळे, मोती इ.)
४८. पुन्हा
४९. अपेक्षाभंग
५०. संतोष, आनंद
५१. पूर्णपणे
५३. काळ्या तोंडाचे माकड
५४. लाजणे, ओशाळणे
५६. तमुकचा जोडीदार
५७. बारीक झणझण
५९. मृत्तिका
६०. मेणा
६१. खांदा, खांद्याचे हाड
६२. संगम, एकरुप होणे
६३. धर्म
६४. कट्टर
६६. आश्चर्य
६७. मागणी मान्य करेपर्यंत बसून राहण्याचे आंदोलन
६८. सैन्याचा दाणागोटा
७०. संतापी
७१. रतीचा पती
७२. सडक
७३. फुगीर शेपटीचा छोटा प्राणी

**उभे शब्द**
१. नशिबवान
२. व्रत
३. गाड्या उभ्या करण्याची जागा
४. नम्र, वाकलेला
५. आड, बारव
६. काळाचा महिमा
७. भात शिजतानाचा आवाज
९. मुलगी
१०. आस्वाद
११. प्रफुल्लता
१७. नुकतेच सरलेले दिवस
१९. आरण्यवास
२३. इतर, बाकीचे
२३अ. 'अरे संसार, संसार, जसा तवा चुल्ह्यावर, जवा हाताला चटके, तवा मिळते भाकर' म्हणणारी खान्देशी कवयित्री
२४. मलई
२५. देवळाची पायरी
२८. छोट्या आकाराचा
३०. करणारा, करून घेणारा (परमेश्वर)
३१. समशेर
३३. आवड, रूची
३४. ढोंग, थाप, सोंगाच्या अनुरुप वर्तन
३५. शीलवान, सद्वर्तनी
३७. पिकासाठी जमीन तयार करण्याचे काम
४१. खोडण्याचे साधन
४३. लढाऊ गलबतांचा ताफा
४५. हसऱ्या चेहऱ्याचा
४६. बंधन
४७. रामदासस्वामींचा जन्मदिवस
४८. दुर्दशा
५१. विद्येचे माहेरघर
५२. अनुमती
५३. घाव, प्रहार
५५. मध्यभागी
५६. खुसखुशीत, नाजूक
५८. बडबड
५९. सन्मानाची रक्कम
६०. निभाव
६३. 'टणटणी'ची फुले– त्याचे झाड
६४. एक जंगली फूल
६५. पोट
६९. जिवलग मित्र

**जम्बो शब्दकोडे क्र. ९८० चे उत्तर**

आडवे उत्तर : १.द्विशतक ४.काललवण ६.पंतप्रधान ९.हालचाल ११.दाखला १२.यवन १४.अकलमंद १६.वरखल १८.पाकळी १९.रग २०.लाज २२.धनवान २५.नाशिक २७.रामायण २८.सहदेव ३०.कपाळमोक्ष ३३.देह ३४.राजस ४०.चारा ४३.वारा ४४.अदपाव ४६.रजक ४७.रिकामटेकडा ४९.टाळाटाळ ५१.रमणी ५३.फोल ५४.गो ५५.बल्लव ५६.सवत ५७.वसाड ६०.रमारम ६२.जमणे ६३.पास ६५.करवंद ६७.जमीन ६८.मलम ६९.टाकणखार ७१.दासबोध ७३.वसा ७५.सवतीमत्सर ७७.दक्ष ७८.तरतरीत ७९.रत ८०.मुका मार

उभे उत्तर : १.द्वितीय २.तहान ३.कल ४.काल ५.लवकर ६.पंख ७.तलाव ८.नकारघंटा १०.चाबूक ११.दादला १३.वचन १५.लगत १७.रक्षक १८.पान २१.जनादेश २२.धडक २३.वाचाळ २४.माय २६.शिव २७.राक्षस २८.सहचारिणी २९.राजवाडा ३१.पारद ३२.मोरावळा ३५.सरा ३७.गरळ ३८.रज ३९.बाकरवडी ४१.राका ४२.फाटे फोडणे ४४.अजब ४५.पाटा वरवंटा ४८.कल ५०.टापर ५२.मत ५७.वजनदार ५८.साम ५९.भूपाल ६१.मादक ६४.समकक्ष ६५.करवत ६६.नीरव ६७.जनमत ६८.मध ७०.खास ७२.बोलका ७४.सार ७६.तीर ७७.दर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## स.प.महाविद्यालयाची भाविका भारतीय क्रिकेट संघाची कर्णधार

पुणे (दैनिक संध्या) : सर परशुरामभाऊ महाविद्यालयाची इयत्ता १२ वी ची विद्यार्थिनी भाविका अहिरे हिची १९ वर्षांखालील भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार म्हणून निवड झाली. भाविका बंगळुरू येथील क्रिकेट अकादमीमधे रुजू होऊन येत्या श्रीलंका संघासोबत होणाऱ्या दौऱ्यामधे भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. महाविद्यालयात भाविका हिचा सत्कार शि.प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष राधेश्याम अग्रवाल यांनी केला. यावेळी भाविकाचे वडील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, उपप्राचार्य दिनेश सूर्यवंशी, परिवारातील सदस्य, क्रिडाशिक्षक व प्राध्यापक उपस्थित होते. उच्च प्रतीच्या क्रीडाक्षेत्राची परंपरा असलेल्या स.प महाविद्यालयाकरीता व पुणे शहराकरीता देखील हा एक अत्यंत गौरवाचा क्षण आहे, असे उद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी काढले. याप्रसंगी शि.प्र. मंडळीद्वारे येत्या काळात नवे क्रीडा धोरण बनवून क्रीडा विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहाय्य व प्रोत्साहन देण्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले. भाविकाच्या या यशाबद्दल शि.प्र.मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर, सदस्य तुषार कुलकर्णी, पराग ठाकुर यांच्यासह इतर सर्व सदस्य तसेच महाविद्यालयाचे सर्व उप प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

## प्रतिबंधित विदेशी मांगूर माशांवर संयुक्त कारवाई; 3,500 किलो मासे नष्ट

पुणे (दैनिक संध्या) : मौजे पेठ, नायगाव, ता. हवेली, जि. पुणे येथे शासनाने बंदी घातलेल्या विदेशी मांगूर जातीच्या माशांचे अनधिकृत संवर्धन करण्यात येत असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर ११ जून २०२६ रोजी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पुणे आणि उरुळी कांचन पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. या कारवाईदरम्यान संबंधित शेततळ्यातून अंदाजे ३,५०० किलो प्रतिबंधित विदेशी मांगूर जातीचे मासे बाहेर काढून कायदेशीर पद्धतीने नष्ट करण्यात आले. याप्रकरणी गणेश शंकर गायकवाड, रा. मौजे पेठ, नायगाव, ता. हवेली, जि. पुणे यांच्याविरुद्ध प्रथम खबर क्र. ०१४८/२०२६, दि. ११ जून २०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केंद्र शासनाने प्रतिबंधित विदेशी मांगूर (Clarias Gariepinus) या माशांच्या संवर्धनावर बंदी घातली आहे. या प्रजातीमुळे स्थानिक जैवविविधता व पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता असून, त्याचे सेवन केल्यास मानवी आरोग्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे या प्रतिबंधित प्रजातीच्या माशांचे संवर्धन, संगोपन अथवा विक्री कोणीही करू नये. अन्यथा संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३, अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम, १९८६ तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पुणे यांनी केले आहे.

## 'गुरूपेक्षाही अधिक' या अनुवादित पुस्तकाचे मंगळवारी प्रकाशन

पुणे (दैनिक संध्या) : प.पू. वामन दत्तात्रेय गुळवणी महाराज यांच्या 'मोअर दॅन अ गुरु' या श्रीनिवास दत्तात्रेय आचार्य यांनी लिहिलेल्या प्रथम इंग्रजी चरित्राचा त्यांच्या कन्या नंदिनी आचार्य यांनी केलेला मराठी अनुवाद 'गुरूपेक्षाही अधिक' या पुस्तकाचे प्रकाशन मंगळवार, दि. १६ जून रोजी होणार आहे, अशी माहिती आयोजिका नंदिनी आचार्य व नागेश्री आचार्य यांनी दिली. कोथरूड मयूर कॉलनी येथील एम.ई.एस. ऑडिटोरियम बालशिक्षण मंदिर सभागृह येथे सायं. ५ वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. श्रीराम जन्मभूमि न्यास अयोध्याचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरीजी महाराज यांच्या हस्ते प्रकाशन होणार असून अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ.न.म. जोशी असणार आहेत. गुळवणी महाराज आश्रम वासुदेव निवासाचे प्रधान विश्वस्त शरदशास्त्री जोशी हे देखील उपस्थित राहणार आहेत. उत्कर्ष प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले असून सु.वा.जोशी, सविता जोशी, नीलिमा वाडेकर यांनी विशेष सहकार्य केले आहे. तरी पुणेकरांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे.




## पीएमपीएमएलमध्ये मेगाभरती; 1500 नवीन बसांसाठी 4000 चालक-वाहकांची नियुक्ती

पुणे (दैनिक संध्या) : पीएमपीच्या ताफ्यात लवकरच १५०० नवीन बस दाखल होणार असून, या गाड्यांच्या नियोजनासाठी तातडीने २ हजार चालक आणि २ हजार वाहक अशी एकूण 4 हजार चालक-वाहक यांची कंत्राटी पद्धतीने मेगाभरती केली जाणार आहे. या भरतीसाठीची आवश्यक निविदा प्रक्रिया प्रशासनाने पूर्ण केली असून, कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीसाठी लवकरच अधिकृत एजन्सीची नियुक्त केली जाणार असल्याची माहिती आहे. शहराचा वाढता विस्तार आणि प्रवाशांची संख्या लक्षात घेता सध्या अनेक मार्गांवर बस अपुऱ्या पडत आहेत. हाच ताण कमी करण्यासाठी प्रशासनाने चालू वर्षात १५०० नवीन गाड्या आणण्याचे नियोजन केले आहे. मात्र, गाड्या वाढवताना त्यांचा कारभार सुरळीत चालवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची गरज लागणार आहे. या पार्श्वभूमीवर ४ हजार चालक-वाहकांची भरती केली जाणार आहे. आणि ही भरती बेरोजगार तरुणांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. एजन्सीची नियुक्ती अंतिम टप्प्यात असून, त्यानंतर प्रत्यक्ष भरती प्रक्रियेला गती दिली जाणार आहे. या भरतीमुळे पीएमपीच्या सेवेचा दर्जा तर सुधारेलच, शिवाय ४ हजार बेरोजगारांना नोकरी मिळणार आहे. नवीन चालक-वाहकांच्या नियुक्तीनंतर मार्गांवरील बसेसच्या फेऱ्या वाढतील आणि प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागणार नाही, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# सहकार चळवळ महाराष्ट्राच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन'

### माजी केंद्रीय सुरेश प्रभू यांचे प्रतिपादन; सहकार पर्व- राज्यस्तरीय सहकार परिषदेचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)




"यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीने सहकार चळवळीला दिशा मिळाली आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' म्हणून सहकार चळवळ महत्वपूर्ण ठरली. आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकास साधणारी ही सहकार चळवळ येणाऱ्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेची ताकद असणार आहे. सनदी लेखापालांनी सहकाराला अधिक सक्षम करण्यासाठी आर्थिक व्यवस्थापनाची जोड देण्यात योगदान द्यावे," असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री सीए सुरेश प्रभू यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (डब्ल्यूआयआरसी), आयसीएआय पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सातारा, सांगली, इचलकरंजी व लातूर या शाखांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'सहकार पर्व- राज्यस्तरीय सहकार परिषदेचे उद्घाटन शनिवारी झाले. त्यावेळी प्रभू दूरभाष प्रणालीद्वारे (व्हर्च्युअल) बोलत होते. दोन दिवसांच्या या सहकार परिषदेत विविध विषयांवर चर्चा होत आहे.

गणेशखिंड रस्त्यावरील कॉसमॉस टॉवरमध्ये आयोजित कार्यक्रमात 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए अभिषेक धामणे, सीए राजेश अग्रवाल, सीए डॉ. यशवंत कासार, आयसीएआय पुणे शाखेचे अध्यक्ष सीए प्रणव आपटे, उपाध्यक्ष सीए नीलेश येवलेकर, सचिव सीए नेहा फडके आदी व्यासपीठावर उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष सीए महावीर कोठारी, सातारा शाखेचे अध्यक्ष सीए झोहेब मुलानी, सांगली शाखेचे अध्यक्ष सीए निलेश पाटील यांच्यासह सीए, सहकार क्षेत्रातील मान्यवर, तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सीए सुरेश प्रभू म्हणाले, "स्वातंत्र्यपूर्व काळापासून आपल्याकडे सहकार क्षेत्र अस्तित्वात आहे. पुढे यशवंतरावांसह वसंतदादा पाटील, शरद पवार आणि इतर सर्वच नेत्यांनी सहकाराला उभारी दिली. पश्चिम महाराष्ट्राच्या विकासात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. सामाजिक परिवर्तनाचे माध्यम असलेल्या सहकाराने राजकरण, समाजकारण, अर्थकारण सर्वच गोष्टीना वेगळी दिशा दिली आहे. सहकाराचे महत्व ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली. अमित शहा यांच्यासारख्या सक्षम मंत्र्याकडे त्याचा कार्यभार दिला. त्यामुळे देशभरात सहकार क्षेत्राचा विस्तार होत असून, साखर कारखाने, कृषिपूरक व्यवसाय, संस्था, दूध डेअरी, सहकारी बँक, पतसंस्था अशा विविध सहकारविषयक गोष्टींचा व्यापक विस्तार होत आहे. भविष्यात सहकार क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देणार आहे. सीएना या क्षेत्रातही मोठ्या संधी उपलब्ध आहेत."

सीए चंद्रशेखर चितळे म्हणाले, "शेतीप्रधान अर्थव्यवस्थेला सक्षम करण्यात सहकार क्षेत्राची भूमिका महत्वाची राहिली आहे. सहकाराचे महत्व देशभर वाढले असून, सहकारातून समृद्धीकडे या ध्येयाने सरकार काम करीत आहे. या चळवळीला व्यापक रूप यावे, व्यवस्थापन नीट होऊन, भागधारकांना लाभ व्हावा, अर्थव्यवस्थेला उभारी मिळावी, सहकारावर अवलंबून सर्व घटकांना विकासाची संधी मिळावी, यासाठी नव्याने आलेले सहकार धोरण उपयुक्त ठरेल. आर्थिक व्यवस्थापनात सनदी लेखापालांनी पुढाकार घ्यावा."

सीए अभिषेक धामणे यांनी सहकाराचे महत्व अधोरेखित करीत या परिषदेच्या आयोजनामागील भूमिका मांडली. पुढील १५ वर्षांत सहकार क्षेत्रात आमूलाग्र बदल होणार असून, येऊ घातलेल्या या नवीन पर्वात आपण सनदी लेखापाल योगदान द्यायला हवे, असेही त्यांनी नमूद केले. सीए डॉ. यशवंत कासार व सीए राजेश अग्रवाल यांनी मनोगत व्यक्त केले. सीए प्रणव आपटे यांनी स्वागत प्रास्ताविक केले. सीए नेहा फडके यांनी सूत्रसंचालन केले. सीए निलेश येवलेकर यांनी आभार मानले.

## आरटीई प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ; प्रतीक्षा यादीतील पालकांना दिलासा

पुणे (दै. संध्या)

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेतील प्रतीक्षा यादीच्या दुसऱ्या टप्प्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे प्रवेशासाठी प्रतीक्षेत असलेल्या पालकांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वी प्रतीक्षा यादीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रवेश निश्चित करण्यासाठी १२ जून २०२६ पर्यंतची मुदत दिली होती. मात्र, विविध कारणांमुळे दुसऱ्या टप्प्यास १३ जून २०२६ ते १९ जून २०२६ या कालावधीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेतील प्रतीक्षा यादीसाठी देण्यात आलेली मुदतवाढ अंतिम असून, त्यानंतर कोणतीही अतिरिक्त मुदत दिली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

प्रतीक्षा यादीत नाव असलेल्या पालकांनी संबंधित शाळा, पडताळणी समिती अथवा शिक्षण विभागाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत आणि प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

## भाताच्या विविध देशी वाणांच्या प्रदर्शनाचे वनराई संस्थेच्या वतीने आयोजन

पुणे (दै. संध्या)

नैसर्गिक शेती, विषमुक्त अन्ननिर्मिती आणि आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देणारे सह आयुक्त तथा प्रयोगशील शेतकरी प्रमोद जाधव लिखित 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' या पुस्तकाचे प्रकाशन सोमवार, १५ जून रोजी पुण्यात होणार आहे. वनराई संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रकाशन सोहळ्याचे उद्घाटन महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते होणार आहे. वनराई संस्थेचे अध्यक्ष रवींद्र धारिया यांच्या निमंत्रणाखाली होणाऱ्या या कार्यक्रमात भाताच्या विविध देशी वाणांचे प्रदर्शन हे विशेष आकर्षण असणार आहे.

पर्वती येथील वनराई मुख्यालयातील इको-हॉलमध्ये सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून त्यानंतर नैसर्गिक भातशेती विषयावरील चर्चासत्रही होणार आहे. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी असणार असून समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, कृषी प्रक्रिया व नियोजन/विस्तार विभागाचे कृषी संचालक विनयकुमार आवटे, कृषी-जैवविविधता तज्ज्ञ संजय पाटील तसेच विनायक वैद्य खडीवाले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

हे पुस्तक नैसर्गिक भातशेतीची संकल्पना, बीज निवड व प्रक्रिया, नैसर्गिक खते, बीज संरक्षण, खाडी किनारपट्टीवरील भातशेती, भात व आरोग्य यांसह विविध विषयांवरील ५० लेखांचा समावेश असलेले मार्गदर्शक पुस्तक आहे. संशोधन, पारंपरिक ज्ञान आणि प्रत्यक्ष शेतकरी अनुभव यांचा संगम असलेल्या या पुस्तकामध्ये नैसर्गिक शेतीकडे वळताना घ्यावयाची काळजी, वनस्पतींची प्रतिकारशक्ती वाढविण्याचे उपाय तसेच शेतीमधील विविध समस्यांवरील शास्त्रीय उपाययोजनांची माहिती देण्यात आली आहे. पुस्तकातील प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये १०१ सेंद्रिय कीड-रोगनाशकांच्या कृती, लाल-तपकिरी तांदळाचे महत्त्व, मासळीपासून खतनिर्मिती, भात पीक लोळणे आणि पूरपरिस्थितीवरील उपाय, तसेच सेंद्रिय शेतीमागील विज्ञान यांचा समावेश आहे. नैसर्गिक शेतीचे अभ्यासक, प्रयोगशील शेतकरी आणि कृषी क्षेत्रातील संशोधकांसाठी हे पुस्तक संदर्भग्रंथ ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. वनराई संस्थेचे संस्थापक मोहन धारिया यांच्या पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत ग्रामीण विकासाच्या विचारांचा वारसा पुढे नेत हे पुस्तक प्रकाशित करण्यात येत असून आगामी भातलावणी हंगामात शेतकऱ्यांना त्याचा मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## पुणे पोलिसांसमोर इंधन संकट; डिझेल साठा संपल्याने वाहनसेवा प्रभावित

पुणे (दै. संध्या)




पुणे शहर पोलिसांच्या मोटार परिवहन विभागातील डिझेलचा साठा पूर्णपणे संपल्याने पुढील आदेश मिळेपर्यंत कोणतीही डिझेल वाहने इंधन भरण्यासाठी पाठवू नयेत, असे आदेश सर्व पोलिस ठाणे, शाखा आणि विभागांना देण्यात आले आहेत. शहरातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, बंदोबस्त आणि आपत्कालीन सेवांसाठी रस्त्यावर धावणाऱ्या पुणे पोलिसांच्या शेकडो वाहनांपुढे इंधनाचे संकट उभे राहिले आहे.

याबाबत मोटार परिवहन विभागाने सर्व पोलिस ठाणे गुन्हे शाखा आणि इतर आस्थापनांना अंतर्गत पत्रव्यवहार केला आहे. यात डिझेल पंपावरील साठा संपल्याचे नमूद करण्यात आले आहे. सध्या केवळ पेट्रोल उपलब्ध असून, पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांनाच इंधन भरण्यासाठी पाठविण्याची परवानगी देण्यात आली आहे.

पुणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या ताफ्यात डिझेलवर चालणारी जवळपास ३०० वाहने आहेत. यामध्ये पोलिस ठाण्यांच्या गस्ती गाड्या, गुन्हे शाखेची वाहने, वाहतूक शाखेची वाहने, दंगल नियंत्रण पथकाची वाहने, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शासकीय गाड्या, तसेच विविध विशेष मोहिमा आणि बंदोबस्तासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांचा समावेश आहे. या वाहनांवर शहरातील पोलिस यंत्रणेचे मोठे कामकाज अवलंबून असते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असलेल्या तणावपूर्ण घडामोडींमुळे इंधन बाजारावर दबाव वाढल्याची चर्चा असताना केंद्र सरकारकडूनही इंधनाचा काटकसरीने वापर करण्यावर भर दिला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ऊर्जा बचत आणि आवश्यक तेवढाच इंधनाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ साठी पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून व्यापक जनजागृती

पुणे (दै. संध्या)

आयुष मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २१ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत व्यापक जनजागृती आणि सहभाग वाढविण्यासाठी विशेष समन्वय मोहीम राबविण्यात येत आहे.

यावर्षीचा योग दिन "ऑनलाईन" पद्धतीने आयोजित करण्यात येणार असून रविवारी, १४ जून रोजी सकाळी ६.१५ ते ७.१५ या वेळेत ऑनलाइन योग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामध्ये 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

योग दिनात जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था, क्रीडा क्लब तसेच विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. सहभागींची नोंदणी "One Device, One Participant" या नियमांनुसार स्वतंत्र डिजिटल उपकरणावरून करणे आवश्यक आहे.

पूर्वनोंदणीसाठी सर्व नागरिक, विद्यार्थी, खेळाडू आणि कर्मचारी यांनी अधिकृत टोल-फ्री क्रमांक १८००-३१५-७००८ वर मिस्ड कॉल देऊन नोंदणी पूर्ण करावी. त्यानंतर सहभागींस ऑनलाइन सत्रासाठी आवश्यक लिंक उपलब्ध करून दिली जाईल.

संस्थांनी आपल्या स्तरावर समन्वयक नियुक्त करून विद्यार्थ्यांची व सदस्यांची नोंदणी सुनिश्चित करावी. तसेच इंटरनेट सुविधा, डिजिटल उपकरणे आणि ऑनलाइन सहभागासाठी आवश्यक तांत्रिक तयारी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कार्यक्रमानंतर सहभागींचे डिजिटल प्रमाणपत्र उपलब्ध होणार असून संस्थांनी सहभागाचा एकत्रित अहवाल पुणे जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या dsopune6@gmail.com या ईमेलवर सादर करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

# भविष्योन्मुख सुशासनाचा नवा अध्याय; ICSI कडून ई-व्होटिंगसह अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांची घोषणा

पुणे (दै. संध्या)



द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (ICSI) यांच्या 27व्या नॅशनल कॉन्फरन्स ऑफ प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीजचे उद्घाटन आज पुण्यात झाले. "Company Secretaries as Leaders: AI, ESG & Stewardship" या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय परिषदेत उद्योग क्षेत्रातील मान्यवर, वरिष्ठ कॉर्पोरेट व्यावसायिक आणि नियामक संस्थांचे अधिकारी सहभागी झाले आहेत.

या प्रसंगी ICSI ने एक ऐतिहासिक घोषणा करत 2026 च्या निवडणुका पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले. विशेष म्हणजे, कोणत्याही व्यावसायिक संस्थेकडून प्राधान्यक्रम मतदान (Preferential Voting) ऑनलाइन पद्धतीने घेण्याची ही जगातील पहिलीच वेळ असल्याचा दावा संस्थेने केला आहे.

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अंशकालीन सदस्य प्रा. (डॉ.) गौरव वल्लभ यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील अनुपालन व्यवस्थेवर भाष्य करताना कंपनी सेक्रेटरीजना विश्वास, उत्तरदायित्व आणि सुशासनाचे प्रमुख घटक असल्याचे सांगितले. AI च्या जबाबदार वापरामुळेच भविष्यातील स्पर्धात्मक आघाडी निश्चित होईल, असे त्यांनी नमूद केले.

पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्कचे नियंत्रक जनरल प्रा. (डॉ.) उन्नत पी. पंडित यांनी कंपनी सेक्रेटरीजना ट्रेडमार्क एजंट म्हणून उपलब्ध असलेल्या संधींवर प्रकाश टाकला. बौद्धिक संपदा व्यवस्थापन आणि सुशासन कौशल्य यांची सांगड घालून कंपनी सेक्रेटरीज भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेतील महत्त्वाचे भागीदार बनू शकतात, असे त्यांनी सांगितले.

ICSI चे अध्यक्ष सीएस पवन जी. चांडक यांनी कंपनी सेक्रेटरीजची भूमिका केवळ अनुपालनापुरती मर्यादित न राहता सुशासन, नवकल्पना आणि शाश्वत विकासाला चालना देणारी बनल्याचे सांगितले. ई-व्होटिंगसारख्या उपक्रमांद्वारे संस्थात्मक पारदर्शकता आणि सदस्यांचा सहभाग वाढविण्याचा ICSI चा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

परिषदेत AI युगातील अनुपालन, ESG समाकलनाद्वारे सुशासन बळकटीकरण, MSME आणि स्टार्टअप्सच्या वाढीस चालना, तसेच IPR पद्धती व प्रक्रिया यांसारख्या विषयांवर तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. पुढील दशकातील कंपनी सेक्रेटरी व्यवसायाचे स्वरूप आणि ICSI च्या शिस्तभंग यंत्रणेवर दोन विशेष पॅनेल चर्चाही आयोजित करण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमात ICSI ने 54वे नॅशनल कन्व्हेन्शन, ट्रेडमार्क्सवरील संयुक्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम, ESG आणि UK Regulatory Compliance अभ्यासक्रम, ICSI India-Australia Facilitation Centre, मॉरिशसमधील पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद आणि ICSI Invest India Summit यांसारख्या उपक्रमांची घोषणाही केली.

याशिवाय, संस्थेने Related Party Transactions वरील सुधारित मार्गदर्शक सूचना, Corporate Governance – From Compliance to Excellence Version 5.0, REITs आणि InvITs साठी Secretarial Compliance Report संदर्भातील मार्गदर्शक सूचना आणि परिषदेचे स्मरणिकेचे प्रकाशन केले.

सदस्यांसाठी अधिक संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने ICSI ने eMSME, Axar Digital Services, Bharath Cloud Services, TSS Consultancy Private Ltd. आणि पुण्यातील Symbiosis University यांच्यासोबत सामंजस्य करार (MoU) देखील केले.

कार्यक्रमात ICSI चे उपाध्यक्ष सीएस द्वारकानाथ चेन्नूर, परिषद अध्यक्ष सीएस राजेश तरपरा, कार्यक्रम संचालक सीएस आशिष करोडिया, WIRC चे अध्यक्ष सीएस योगेश चौधरी आणि पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएस विशाल एन. साळुंखे यांनीही उपस्थितांना संबोधित केले. संस्थेचे सचिव सीएस आशिष मोहन यांनी आभार प्रदर्शन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### न्हावे गावात भीषण पाणीटंचाई; 15 दिवसांनी अवघ्या 30 मिनिटांचा पाणीपुरवठा

उरण (दैनिक संध्या) : पनवेल तालुक्यातील न्हावे गावात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. गावात ग्रामपंचायतीमार्फत तब्बल १४ ते १५ दिवसांनी केवळ ३० मिनिटांसाठी पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रश्न सोडवावा, अशी मागणी ग्रामसुधारक मंडळ न्हावे माजी अध्यक्ष योगेश कुंडलिक पाटील यांनी केली आहे. योगेश पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षभरापासून गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना पाणी साठवून ठेवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. अनेक कुटुंबांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांचे हाल होत आहेत. गावातील मुख्य जलवाहिनीवरून काही व्यक्तींनी अनधिकृत जोडण्या घेऊन पाणीचोरी सुरू ठेवल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी बेकायदेशीर जोडण्या तोडण्यात आल्या होत्या. मात्र त्या पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत असल्याने पाणीचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. या प्रकारामुळे अधिकृत ग्राहकांना मिळणाऱ्या पाण्याच्या प्रमाणात मोठी घट होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. योगेश कुंडलिक पाटील यांनी सांगितले की, गावातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी सिडको प्रशासन, संबंधित शासकीय विभाग आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

### भंडारी मंडळ, डोंबिवली तर्फे प्रथमच वधु-वर मेळावा उत्साहात संपन्न

डोंबिवली (दैनिक संध्या) : समाजात वेगवेगळ्या जाती धर्माची वधु-वर विवाह सुचक मंडळ कार्यरत आहेत.तसेच डोंबिवली येथेही भंडारी मंडळ विविध सामाजिक कार्यात अग्रेसर आहे.भंडारी मंडळाचे स्वमालकीचे कार्यालय डोंबिवली स्टेशन जवळच आहे.तेथे मंडळाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात.त्याच अनुषंगाने भंडारी मंडळ डोंबिवली तर्फे नुकताच आपल्या भंडारी समाजातील विवाह इच्छुक वधू-वर मेळावा प्रथमच आयोजित केला होता.सदर मेळाव्याकरिता स्थानिक इच्छुक तसेच ठाणे, मुंबई, बोरीवली, कल्याण, बदलापूर व कर्नाटक, गुजरात, अहमदाबाद येथून इच्छुकांनी हजेरी लावली होती.या मेळाव्याला समाजातील इच्छुक मुला-मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या वधू-वर मेळाव्याचे सुत्रसंचलन मंडळाचे अध्यक्ष रजनीश चौगुले व विश्वस्त गोपाळकृष्णा वराडकर यांनी उत्तमरीत्या केले.या कार्यक्रमाला भंडारी समाजातील उद्योजक सन्मानिय शांतीधर पारकर,माजी नगरसेवक नंदकुमार मालवणकर व शिवसेना शहरप्रमुख श्रीमती किरण मोंडकर उपस्थिती होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मंडळाचे विश्वस्त संजय पोखरणकर, रहुवीर तांडेल, प्रदीप तांडेल यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला व गणपतीच्या प्रतिमेला हार अर्पण व पुजन करुन कार्यक्रमाला सुरुवात केली.वधु-वर मेळाव्याला मुला-मुलींची उपस्थिती लक्षणिय होती.हा मेळावा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे खजिनदार अजित कांबळी, सरचिटणीस महेश पारकर, चिटणीस रविंद्र सातार्डेकर, उपाध्यक्ष बापू गोवेकर, सदस्य पांडुरंग पेडणेकर, ज्ञानेश्वर कांबळी, वैभव शिरोडकर, प्रदीप चुडनाईक, सचिव ज्ञानदेव जाधव आणि नव्याने मंडळात रुजू झालेले अभिषेक मुळगेकर यांनी तांत्रिक व संगणक बाबी उत्कृष्टपणे सांभाळून मंडळाला सहकार्य केले. हा वधू-वर मेळावा व्यवस्थित संपन्न व्हावा याकरिता सौ.चौगुले, सौ.तांडेल, सौ.सातार्डेकर, सौ.शिरोडकर आणि सौ.पूनम अभिषेक मुणगेकर या महिलांनी सहभाग घेतला.





## स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ

# राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री

मुंबई (दै. संध्या) :

स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने ७ लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

आरोग्य क्षेत्रात बँकेच्या 'सीईंग इज बिलिव्हिंग' या प्रमुख उपक्रमांतर्गत ४ लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे.

स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# 'जागतिक शांतता कराराचे' यशवंत भोसले यांच्याकडून स्वागत!

पिंपरी (दै. संध्या) :

गेल्या काही दिवसांपासून आखाती (खाडी) देशांमध्ये सुरू असलेल्या इराण आणि इस्रायल यांच्यातील भीषण युद्धाला अखेर पूर्णविराम मिळण्याची ऐतिहासिक शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अधिकृत पत्रकार परिषद घेऊन दोन्ही देशांमध्ये युद्धबंदीबाबत सकारात्मक "जागतिक शांतता करार" होत असल्याची मोठी घोषणा केली आहे. या घोषणेमुळे संपूर्ण जगाने सुटकेचा श्वास घेतला असून, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंत भोसले यांनी या जागतिक शांतता कराराचे जाहीर स्वागत केले आहे. आखाती देशांतील हे युद्ध थांबवण्यासाठी भारत देश आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जागतिक मुत्सद्देगिरीचा अत्यंत मोठा आणि महत्त्वपूर्ण वाटा



राहिला असल्याचा दावाही भोसले यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना केला.

प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधताना यशवंत भोसले यांनी युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रकाश टाकला. २८ फेब्रुवारी रोजी इस्रायलने इराणवर केलेल्या लष्करी हल्ल्यानंतर आखाती देशात भीषण युद्धाचा भडका उडाला होता. या संघर्षात अमेरिका थेट सामील झाल्यामुळे त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागले होते. आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोल, डिझेल आणि नैसर्गिक वायूचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने जगभरात महागाई प्रचंड वाढली होती, ज्याचा थेट फटका कामगार वर्गाला बसत होता. या युद्धाच्या सुरुवातीलाच 'राष्ट्रीय श्रमिक आघाडी'च्या वतीने जगात पहिली ऐतिहासिक शांतता रॅली काढून युद्ध थांबवण्याचे अधिकृत आवाहन करण्यात आले होते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

### वाहतुकीची अडवणूक करू नये

मुंबई (दै. संध्या) : गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत तलावातून गाळ वाहून नेणाऱ्या वाहतुकीची अडवणूक करण्यात येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. अशी अडवणूक करणे योग्य नाही, यासाठी महसूल, गृह आणि मृद व जलसंधारण विभागाने लक्ष घालून संबंधितांवर कार्यवाही करावी, असे निर्देश मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिले. मृद व जलसंधारण विभागाच्या 15 ऑक्टोबर 2024 च्या शासन निर्णयानुसार 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान' ही योजना राज्यात कायमस्वरूपी राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील जलसाठ्यात साचलेला गाळ आणि नाल्यांचे खोलीकरण करण्याचे काम संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन करण्यात येते.


महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे- ४११००१

दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४५७

Web- www.mahapwd.gov.in and e-mail- eastpune.ee@mahapwd.gov.in

ई-निविदा सूचना क्रमांक १३ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४५७) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२. दिनांक २७/९/२०१८ व शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई यांचे परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ अन्वये नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | अंदाजित रक्कम रुपये (अक्षरात) |
|---|---|---|---|
| १ | बारामती शहरामध्ये सुसज्ज ऑलंपिक दर्जाचा जलतरण तलाव बांधणे (टप्पा-२) ता. बारामती, जि. पुणे. | ४,२६,९०,३०१/- | रूपये चार कोटी सव्वीस लाख नव्वद हजार तीनशे एक फक्त |

टिप

वरील निविदेत एकूण ०१ काम समाविष्ट असून या निविदेवरील संपुर्ण माहिती खालीप्रमाणे संकेतस्थळावर दि. १५-०६-२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)

https://mahatenders.gov.in (निविदा सुचना व निविदा कागदपत्रे)

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.)

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग,
पुणे-४११००१.

*क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C1122*


### पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे मूळ आराखड्यानुसारच

मंचर (दैनिक संध्या) : पुणे-नाशिक प्रस्तावित रेल्वे मार्ग आंबेगाव, खेड व जुन्नर तालुक्यातूनच जावा, यासाठी परदेशातील काही तज्ज्ञांशी चर्चा करण्यात आली असून खोडद येथील जागतिक दुर्बीण (जीएमआरटी) प्रकल्पामुळे या मार्गाला कोणताही तांत्रिक अडथळा निर्माण होणार नसल्याचा त्यांचा प्राथमिक अभिप्राय असल्याची माहिती राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिली. मंचर येथील शरद सहकारी बँकेच्या सभागृहात रविवारी (ता. १४) पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषता जुन्नर ता जुन्नर जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

आमचे अशील नामे श्री. प्रशांत शांताराम पातुरकर यांचे चुलते मधुकर त्रिंबक पातुरकर नावे घेतलेले अस्सल खरेदीखत (दस्त क्रमांक ज.न.र १४२/१९९४) गहाळ झाले आहे.

मिळकतीचे वर्णन :- तुः पुणे, पो. तु. जुन्नर, ता. व. पं. स. जुन्नर, जि. प. पुणे पैकी नगरपरिषद जुन्नर यांचे हद्दीतील सिटी सर्वे न ३९२८ ब वरील मिळकत यांसी चतुःसीमा

| सिटी सर्वे | क्षेत्र (चौ.मी) | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ३९२८ब | ४७.८४ | रस्ता | सि.स.न ३९२९ | सि.स.न ३९२७ | सि.स.न ३९२८ ब पैकी |

येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील झाडझाडोरा तदंगभूत वस्तू व जाणेयेणेचे वहिवाटीचे सर्व हक्कासह दरोबस्त मिळकत,

सदर मालमत्ता आमचे अशीलांचे चुलते मधुकर त्रिंबक पातुरकर यांनी श्रीमती. गंगुबाई त्रिंबक पातुरकर यांचेकडून खरेदी केली होती. सदर खरेदीखत आमचे अशिलांनी खूप शोध घेऊनही सापडत नाही. म्हणून आमचे अशिलांनी CCTNS प्रणालीद्वारे ऑनलाईन तक्रार देखील नोंदवली आहे. सदरील मिळकत श्री. प्रशांत शांताराम पातुरकर यांनी equitas small finance bank यांचेकडे गहाण ठेवणाचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असून सदर मिळकत तबदील करण्याचा त्यांना अधिकार आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार, गहाण, बक्षीस, दान, अन्न, वस्त्र, पोटगी, वहिवाट वगैरे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी व तक्रार नोंदवावी. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

जुन्नर
दि.१४/०६/२०२६

येणेप्रमाणे जाहीर नोटीस
सही/-
ॲड. समीर ब. पुरवंत
बी.कॉम एल एल.बी.
मो.९९६०७५७६७७
ऑफिस - सदाबाजार पेठ,
जुन्नर, ता पुणे. जुन्नर जि.४१०५०२

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the general public, particularly to the residents of Junnar, asuka Junnar, District Pune and surrounding areas, that the original Sale Deed bearing Document No. J.N.R. 142/1994 standing in the name of Mr. Madhukar Trimbak Paturkar (uncle of my client Mr. Prashant Shantaram Paturkar) has been lost/misplaced.

Description of Property

Property situated within the limits of Junnar Municipal Council, Taluka Junnar, District Pune, bearing City Survey No. 3928-B, admeasuring 47.84 Sq. Mtrs., bounded as under:

| City Survey No. | Area (Sq. Mtrs.) | East | South | West | North |
|---|---|---|---|---|---|
| 3928-B | 47.84 | Road | C.T.S. No. 3929 | C.T.S. No. 3927 | Part of C.T.S. No. 3928-B |

The property described hereinabove, together with all trees, standing structures, movable attachments, rights of way, easementary rights, access rights, and all other appurtenant rights attached thereto, constitutes the said property.

The aforesaid property was purchased by Mr. Madhukar Trimbak Paturkar, the uncle of my client, from Mrs. Gangubai Trimbak Paturkar under a registered Sale Deed. Despite diligent and exhaustive efforts made by my client, the original Sale Deed could not be traced and is presumed to have been lost. Accordingly, my client has also lodged an online complaint regarding the loss of the said document through the CCTNS (Crime and Criminal Tracking Network & Systems) portal.

My client, Mr. Prashant Shantaram Paturkar, has proposed to mortgage the said property with Equitas Small Finance Bank. The said property is believed to be free from all encumbrances, claims, and liabilities, and my client is fully entitled to mortgage, transfer, or otherwise deal with the said property.

Therefore, if any person, institution, bank, financial entity, legal heir, claimant, or any other party has any right, title, interest, claim, charge, mortgage, lien, gift, maintenance right, easement, possession right, inheritance claim, or any other objection whatsoever in respect of the said property, they are hereby called upon to submit their claim or objection in writing, together with original supporting documents, to the undersigned within 7 (Seven) days from the date of publication of this notice.

Failing which, it shall be presumed that no person has any claim, right, title, interest, or objection in respect of the said property, and any claim or objection raised thereafter shall not be entertained.

Place : Junnar
Date : 14/06/2026

Hence, this Public Notice.

Sd/-
Adv. Sameer.B.Purvant
Advocate
(Sadabazar Peth, Junnar,
Tal. Junnar, Dist. Pune)


# अपोलो टायर्स करणार वूमन इन ब्ल्यूच्या प्रवासामागील माईल्स अँन्ड मोमेंटम साजरा

मुंबई (दै. संध्या)

'हर सफर में दम है' या शक्तीशाली मोहिमेला अनुसरुन अपोलो टायर्स या भारतीय राष्ट्रीय क्रिकेट टिमचे प्रमुख प्रायोजक असलेल्या कंपनी तर्फे आता नवीन अध्याय सुरु करत महिलांच्या वर्ल्ड कपच्या आधी त्यांच्या प्रोत्साहक अशा प्रवासावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने नवीन चित्रपट सुरु करणार आहे.

ही मोहीम खेळाडूंच्या कठीण आणि अनेकदा नजरेआड राहणाऱ्या प्रवासांचा गौरव करण्याच्या त्याच भावनेला पुढे नेते, ज्याचा आधार एक हृदयस्पर्शी आणि सिनेमॅटिकदृष्ट्या प्रभावी चित्रपट आहे. हा चित्रपट राष्ट्रीय आयकॉन्स हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्स, शफाली वर्मा आणि रेणुका यांनी जागतिक स्तरावर ओळख मिळवण्यापूर्वी पार केलेल्या शांत, खडतर आणि अनेकदा एकाकी वाटचालींचे अत्यंत जवळून चित्रण करतो. हा चित्रपट एका हृदयाला भिडणाऱ्या मूळ संगीतबद्ध ध्वनिमुद्रिकेवर आधारित आहे, जी त्यांच्या वैयक्तिक प्रवासांतील भावनिक भार आणि अंतिम विजय प्रभावीपणे व्यक्त करते.

हा चित्रपट या विजेत्या खेळाडूंच्या घडणाऱ्या सुरुवातीच्या काळाचा सखोल वेध घेतो. त्यांच्या यशामागील वेगळे संघर्ष आणि कधीही हार न मानणारी जिद्द यात दाखवली आहे. मुलांच्या क्रिकेट अकादमीत प्रवेश मिळावा म्हणून लहानपणी शफाली वर्माने केस छोटे कापले, तर हरमनप्रीत कौरने आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी जुन्या परंपरा आणि रूढींना आव्हान दिले. स्मृती मंधानाला तिच्या भावाकडून प्रेरणा मिळाली, जेमिमा रॉड्रिग्स मुलांबरोबर सराव करत होती, आणि रेणुका सिंगला प्रशिक्षणासाठी लांबचा प्रवास करावा लागत होता. त्यांच्या प्रत्येक यशामागील मेहनत, चिकाटी आणि जिद्दीचा हा चित्रपट गौरव करतो.

या मोहिमेबद्दल बोलताना, अपोलो टायर्स लिमिटेडचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक नीरज कनवर म्हणाले: " 'हर सफर में दम है' ही मोहीम नेहमीच केवळ ध्येय गाठण्याचा नव्हे, तर त्या प्रवासाचा सुद्धा गौरव करणारी मोहिम आहे. हीच भावना पुढे नेताना, आम्हाला आमच्या 'वूमन इन ब्लू'च्या न सांगितलेल्या प्रेरणादायी कथा मांडताना खूप अभिमान वाटतो. धैर्य, जिद्द आणि ठाम विश्वासाने भरलेला त्यांचा प्रवास संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. ही मोहीम त्यांच्या अढळ आत्मविश्वासाला आणि चिकाटी व उत्कृष्टतेच्या मूल्यांना दिलेली आदरांजली आहे. भारतीय क्रिकेटबद्दल आमच्या मनात असलेल्या आदर आणि आवडीचे सुध्दा हे प्रतिबिंब आहे."

या चित्रपटामागील आपली कलात्मक भूमिका व्यक्त करतांना सिमरन कनवर यांनी सांगितले " आमचा उद्देश असा चित्रपट तयार करण्याचा होता की ज्यामध्ये हरमनप्रीत, स्मृती, जेमिमा, शफाली आणि रेनुका यांच्या अनुभवांशी



जोडलेला आणि अतिशय आपला वाटेल असा अनुभव मिळू शकेल. 'हर सफर में दम है' या मोहिमेच्या मूळ भावनेतून ही कथा उभी राहिली असली, तरी प्रत्येक खेळाडूच्या वेगळ्या संघर्षांना आणि यशाला न्याय देईल अशा पद्धतीने या कथानकाची मांडणी करण्यात आली आहे. जवळीक निर्माण करणाऱ्या कथनशैलीतून आणि भावनांना स्पर्श करणाऱ्या संगीताच्या माध्यमातून, भारतातील महिला क्रिकेटमागील खऱ्या भावना प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्याचबरोबर, देशभरातील लाखो तरुणींना त्यांच्या स्वतःच्या प्रवासालाही तितकेच महत्त्व आहे, याची प्रभावी जाणीव करून देणे हेही आमचे ध्येय आहे."

या उपक्रमा विषयी आपले विचार व्यक्त करतांना दि बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया(बीसीसीआय) चे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले " अपोलो टायर्सने नेहमीच भारतीय क्रिकेटच्या जिद्दीला आणि आत्म्याला पाठिंबा दिला आहे. आमच्या महिला संघाच्या गौरवशाली प्रवासाचा सन्मान करणारे हे नवे पर्व त्या वचनबद्धतेचाच एक प्रभावी विस्तार आहे. भारतीय संघाची जर्सी परिधान करण्यामागे अनेक वर्षांची मेहनत, समर्पण आणि त्याग दडलेला असतो. हा चित्रपट त्या न सांगितलेल्या कथा सुंदरपणे उलगडतो आणि भारतातील महिला क्रिकेटच्या प्रेरणादायी प्रवासाचा गौरव करतो. या प्रेरणादायी कथा सर्वांसमोर आणण्यासाठी अपोलो टायर्ससोबत सहकार्य करताना आम्हाला अभिमान वाटतो."

या मोहिमेच्या दृष्टिकोनाबद्दल बोलताना, अपोलो टायर्स लिमिटेडचे ग्रुप हेड – मार्केटिंग, उदयन घई यांनी सांगितले " ही मोहीम एखादे यशस्वी सूत्र पुन्हा वापरण्याबद्दल नाही; ती आमच्या मूळ विश्वासाचा मनापासून केलेला विस्तार आहे. महिला क्रिकेटला मिळत असलेला सांस्कृतिक आणि सामाजिक प्रतिसाद आज निर्विवाद आहे. त्यांच्या वेगळ्या अनुभवांशी प्रामाणिक राहणारी आणि त्यांच्याशी भावनिक नाते जोडणारी कथा सांगून आम्हाला त्या प्रवासाचा सन्मान करायचा होता. 'हर सफर में दम है'च्या या नव्या पर्वातून आम्ही जिद्द, चिकाटी आणि संघर्षाच्या अशा कहाण्या आम्ही प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत आहोत, या कहाण्या प्रत्येकाला आपल्याशा वाटतात. यशाच्या शिखरापर्यंत पोहोचण्यासाठी केलेल्या प्रत्येक प्रवासाचा तितक्याच उत्साहाने आणि आदराने गौरव व्हायला हवा, हा संदेशही आम्ही या मोहिमेतून अधिक ठामपणे मांडला आहे."

डिजिटल फर्स्ट अशी ही मोहिम असून याचे प्रसारण हे हाय इम्पॅक्ट डिजिटल टच पॉईंट्सवर करण्यात येणार असल्याने यूट्यूब आणि मेटा मंचांचा वापर करुन वितरण केल्यामुळे ही मोहिम मोठ्या प्रमाणावर क्रिकेटच्या चाहत्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. या सुरुवाती सह ही मोहिम विविध स्थानिक ओओएचसह विशेष अशा इन्फ्लुएन्सर्स बरोबरच्या करारातून आणि संभाषणात्मक समाज माध्यमांवरुन ही प्रसिध्द करण्यात येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### "वृत्तपत्रे वाचा" दिलासाचा जनजागृती उपक्रम

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळे गुरव येथील दिलासा संस्थेच्या वतीने "नियमित वृत्तपत्रे वाचा.! "वाचाल तर वाचाल" हा अभिनव उपक्रम पिंपळे गुरव , नवी सांगवी परिसरात घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मानवी हक्क संरक्षण आणि जागृती या संस्थेचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड होते. याप्रसंगी दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक, प्रकाश घोरपडे,अरुण परदेशी, संगीता जोगदंड, वनिता पुजारी, मंदा भारतकर,डॉ. आर डी पाटील,सानिका पाटील, सुयश कदम, चंद्रकांत घाटे, शहाजी ढोरमले,वीणा मेंगरती,प्रमोद राऊत, संजय शितोळे उपस्थित होते. आण्णा जोगदंड म्हणाले.. "मोबाईल, इंटरनेटच्या जमान्यात वृत्तपत्र वाचन करणे लुप्त होऊ लागले आहे. युट्युब माध्यमातून अफवा पसरविणाऱ्या अनेक बातम्या दिल्या जातात. याउलट वृत्तपत्रे बातमीची शहानिशा करून सत्यता जाणून बातम्या देतात. वृत्तपत्रांमधून अनेक जाणकार साहित्यिक, विविध विषयातील तज्ञ लिहित असतात. मुलांना वृत्तपत्रे वाचण्याची गोडी लावण्याचे काम पालकांचे आहे. यासाठी घरामध्ये कोणते ना कोणते वृत्तपत्र असलेच पाहिजे.!" असे विचार मांडले. दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक म्हणाले.. "वृत्तपत्रे लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. नाममात्र किंमतीमध्ये मिळणारी वृत्तपत्रे छोट्या मुलांना वाचायला दिली तर त्यांच्या ज्ञानात भरच पडेल.!" दिलासा संस्थेच्या वतीने फेमस चौक नवी सांगवी येथील वृत्तपत्र विक्रेत्या राऊबाई बिराजदार, साई चौक नवी सांगवी येथील वृत्तपत्र विक्रेते गौरव मोकाशी, सृष्टी चौक येथील वृत्तपत्र विक्रेत्या मंगल दापकेकर यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच संस्थेच्या कार्यकर्त्यांनी "वृत्तपत्रे वाचा!" हा संदेश देत सृष्टी चौका जवळील घराघरामधून वृत्तपत्रे वाटली. "वाचाल तर वाचाल" नियमित वृत्तपत्रे वाचा हा संदेश यानिमित्त देण्यात आला. मुरलीधर दळवी यांनी आभार मानले.

### वेबसाईटद्वारे गुंतवणुकीच्या आमिषाने तरूणाची 21 लाख 48 हजारांची फसवणूक

पिंपरी (दैनिक संध्या) : ऑनलाइन गुंतवणुकीवर अल्पावधीत मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका तरुणाची तब्बल २१ लाख ४८ हजार ४९० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी निगडी पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम आणि फसवणुकीच्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरूण (वय २३) यांची त्यांच्या मित्रामार्फत आरोपींशी ओळख झाली होती. आरोपींनी "Botbro" नावाच्या वेबसाईटद्वारे गुंतवणूक केल्यास दरमहा ७ ते ८ टक्के परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. त्यानुसार फिर्यादी व त्यांच्या साथीदारांकडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वेळोवेळी एकूण २१ लाख ४८ हजार ४९० रुपये गुंतवण्यात आले. सुरुवातीला आकर्षक परताव्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, गुंतवलेली रक्कम परत काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर ती मिळाली नाही. याबाबत आरोपींकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांनी कोणतीही रक्कम परत न देता आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सुयश सुनील शहापूरे (वय २४), सुजीत सुनील काळे (वय २६) आणि खुशी तिवारी (वय २५) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच Botbro वेबसाईटचा धारक अद्याप फरार असून त्याचाही तपास सुरू आहे. निगडी पोलीस निरीक्षक घोडे पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.


### विश्वजीत बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त 'भव्य आरोग्य महायज्ञा'चे आयोजन

पिंपरी (दैनिक संध्या) : शिवसेना गटनेते तथा नगरसेवक विश्वजीत बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त थेरगाव परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने '९० दिवसांचे भव्य आरोग्य महायज्ञ' आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत विविध वैद्यकीय तपासण्या, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि उपचार सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हा आरोग्य महायज्ञ रविवार, १४ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत रॉयल कोर्ट सोसायटी येथे आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी आपल्या आणि कुटुंबाच्या उत्तम आरोग्यासाठी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. शिबिरामध्ये कॅन्सर संदर्भातील सर्व प्रकारचे मार्गदर्शन व सल्ला, किमोथेरपी, रेडिएशन थेरपी, कॅन्सर सर्जरी, एंजिओप्लास्टी, डायलायसिस, HbA1C तपासणी, फुल बॉडी जनरल चेकअप, मशीनद्वारे मोफत डोळे तपासणी तसेच अल्प दरात डोळ्यांच्या लेझर ऑपरेशनची सुविधा उपलब्ध असणार आहे. आरोग्य विषयक कोणतीही हेळसांड न करता वेळेत तपासणी करून आजारांचे निदान करणे हे निरोगी आयुष्याचे महत्त्वाचे सूत्र असल्याचे आयोजकांनी सांगितले. रॉयल कोर्ट सोसायटीसह परिसरातील सर्व नागरिकांनी या आरोग्य महायज्ञात सहभागी होऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी हेल्पलाइन क्रमांक ८३२७२४२४२४ वर संपर्क साधावा.

### क्रीडा क्षेत्रातील पहिल्याच वर्षी सेंट पीटर्स स्कूलच्या मुलींची दमदार कामगिरी

पिंपरी (दैनिक संध्या) : क्रीडा क्षेत्रात पहिल्याच वर्षी सहभाग घेत सेंट पीटर्स स्कूलच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. टीम आणि वैयक्तिक अशा 14 हून अधिक खेळांमध्ये सहभाग नोंदवत 21 विद्यार्थिनींनी एकूण 80 प्रमाणपत्रे मिळवली आहेत. या यशामध्ये दोन विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग नोंदवून विशेष कामगिरी केली. तसेच ध्रुविता चव्हाण हिने युनिफाईट स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या यशात मानाचा तुरा खोवला. जिल्हा परिषद क्रीडा स्पर्धांमध्ये सेंट पीटर्स स्कूलच्या मुलींनी संघ खेळांमध्येही उत्कृष्ट कामगिरी केली. डॉजबॉल, शूटिंग बॉल, लंगडी आणि रस्सीखेच या खेळांमध्ये शाळेच्या संघांनी अव्वल तीन क्रमांकांमध्ये स्थान मिळवत आपली छाप पाडली. याशिवाय विद्यार्थिनींनी वुशू, कराटे, ज्युडो, बॉक्सिंग, कुराश, युनिफाईट, थाई बॉक्सिंग, बेल्ट रेसलिंग, अष्टा-दु-अखाडा आणि शस्त्रांगण मार्शल आर्ट्स या विविध वैयक्तिक स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन यश संपादन केले.






# कैदी हा समाजाचा अविभाज्य घटक - न्यायमूर्ती श्रीराम मोडक

पिंपरी (दै. संध्या)

'कोणतीही व्यक्ती जन्मजात गुन्हेगार नसते तर गरिबी, बेरोजगारी, वैमनस्य, पैशाचा अथवा संपत्तीचा मोह, चुकीच्या संकल्पना यामुळे गुन्ह्यास प्रवृत्त होते. त्याचे कृत्य कायद्याच्या विरोधात असलेतरी कैदी हा समाजाचा अविभाज्य घटक आहे!' असे विचार मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक यांनी व्यक्त केले. दर्द से हम दर्द तक, सुप्रा लीगल फाउंडेशन, मुंबई विधी सेवा प्राधिकरण या संस्थांच्या वतीने बहाई सेंटर सभागृह, मुंबई येथे पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे, फौजदारी कायदा आणि विनामूल्य कायदेशीर साहाय्य क्षेत्रातील (इंटर्नशिप) प्रशिक्षण अनुभव या दिनांक १६ मे ते १३ जून या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमाच्या समारोप सोहळ्यात शनिवार, दिनांक १३ जून २०२६ रोजी मार्गदर्शन करताना न्यायमूर्ती श्रीराम मोडक बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर पवनकुमार तापडिया, सचिव मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, संस्थेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश साळशिंगीकर, ॲड. सुनीता खंडाळे साळशिंगीकर, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतिश गोरडे आदी उपस्थित होते.

न्यायमूर्ती श्रीराम मोडक पुढे म्हणाले की, 'मी न्यायाधीश म्हणून वेगवेगळ्या न्यायालयात काम केले आहे; पण दर्द से हमदर्द तक या संस्थेने कायद्याच्या कक्षेत राहूनही गरीब, निर्दोष, निरपराध अन् परिस्थितीमुळे असाहाय्य असलेल्या कैद्यांना मोफत न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या विविध मानवतावादी उपक्रमांची माहिती मला उशिरा समजली याबाबत खेद वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सतत दोन वर्षे अभ्यास करून अस्तित्वात आणलेल्या राज्यघटनेने प्रत्येकाला व्यक्तिस्वातंत्र्य प्रदान केलेले आहे. जोपर्यंत दोषसिद्धी होत नाही तोपर्यंत कोणालाही गुन्हेगार मानता येत नाही. आपल्या भारतात वेगवेगळ्या कारागृहात सुमारे पाच लाख कैदी आहेत. कोणालाही फक्त दोन तास एकाच ठिकाणी जखडून ठेवले तर असह्य होते, त्यामुळे या कैद्यांची मानसिक कुचंबणा आपल्या लक्षात येते. गुन्ह्याच्या आरोपानुसार कच्चा कैदी, पक्का कैदी, स्थानबद्ध आरोपी असे कैद्यांचे वर्गीकरण केले जाते. अशावेळी नातेवाईक, मित्र, राजकीय पक्ष त्या कैद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर प्रयत्न करीत असतात; परंतु काहीवेळा जामीनपात्र गुन्हा असूनही दुर्दैवाने कोणीही पाठीशी नाही अशा अभागी कैद्यांना तुरुंगात खितपत पडावे लागते. अशा कैद्यांबाबत केवळ मानवतेच्या दृष्टिकोनातून मोफत कायदेशीर साहाय्य करणाऱ्या दर्द से हमदर्द तक या संस्थेचे कार्य खरोखरच स्तुत्य आहे. वकील होण्यासाठी महाविद्यालयातून कायद्याचे शिक्षण दिले जाते; मात्र प्रत्यक्षात काम करताना ते पुरेसे नाही हा अनुभव नवोदित वकिलांना येतो. या पार्श्वभूमीवर आरोपीची दुसरी बाजू मांडण्याचे, कैद्यांप्रति संवेदनशीलता बाळगण्याचे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण असते; आणि अशा उपक्रमांमुळे ते ज्ञान अन् दृष्टी प्राप्त होते!' न्यायाधीश म्हणून वेगवेगळ्या न्यायालयात केलेल्या कामांचे वैविध्यपूर्ण अनुभव कथन करीत न्यायमूर्ती मोडक यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.



ॲड. आशि नारायण यांनी इंटर्नशिप प्रोग्रामबाबत सविस्तर आढावा घेतला. ॲड. प्रकाश साळशिंगीकर यांनी प्रास्ताविकातून संस्थेने तीन वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याची माहिती देताना कारागृहातील कैद्यांसाठी मोफत खटला चालवण्यासाठी व जामीन देण्यासाठी केलेली मदत, विनामूल्य समुपदेशन केंद्र, कायदेशीर जागरुकता वाढविणे, गोरगरिबांसाठी वकील आपल्या दारी हा राबविलेला विनाशुल्क उपक्रम आदींची माहिती दिली. यावेळी न्यायाधीश प्रशांत कुलकर्णी, ॲड. सुहास पडवळ, ॲड. गणेश नागरगोजे, ॲड. मंगेश खराबे, ॲड. भूषण पाटील, ॲड. ओंकार पाटील, ॲड. विघ्नेश्वर सुब्रह्मण्यम, ॲड. नितीन हजारे हे उपस्थित होते. ॲड. सायली वाणी यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. सतिश गोरडे यांनी आभार मानले.

## 'कृष्णायन' तीन दिवसीय भागवत कथनाने श्रोते मंत्रमुग्ध

पिंपरी (दै. संध्या)

अधिक मासाचे औचित्य साधून तीर्थस्वरूप ज्येष्ठ नागरिक संघ, रावेत तसेच ओम साई ग्रुप, निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'कृष्णायन' या तीन दिवसीय भागवत कथाकथनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले.



तीर्थस्वरूप ज्येष्ठ नागरिक संघ, रावेत येथे दिनांक ११ ते १३ जून या कालावधीत संपन्न झालेल्या 'कृष्णायन' या कृष्ण कथेला श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. पंढरपूर येथील रहिवासी प्रवचनकार विनया कुलकर्णी - उत्पात यांनी श्रीमद् भागवत कथेतील दहाव्या स्कंधातील कथेत यशोदा मातेच्या घरी बालपण, माती खाणे, उखळाला बांधले जाणे, गोपींच्या घरी माखनचोरी करणे पूतना, बकासूर, तृणावर्त अशा राक्षसांचा वध, कालियामर्दन, रासलीला, गोपीप्रेम, यांद्वारे भक्तीचा सर्वोच्च मार्ग दाखवला. तसेच मथुरागमन, कंसवध, द्वारकालीला, जरासंधाशी युद्ध, रुक्मिणीहरण, सुदाम्याचे आख्यान, द्वारकेची स्थापना आणि अंती अवतार समाप्ती इथवर साऱ्या संगीतमय कथा रसाळपणे सादर केल्या.

यावेळी वैभव केंगार यांनी संवादिनीवादन आणि गायनसाथ केली तर ओंकार कुलकर्णी यांनी तबलावादनाची उत्तम साथ दिली. याप्रसंगी शिरीष कुंभार आणि शीला कुंभार यांचा विठ्ठल - रुक्मिणी वेषात विवाह लावण्यात आला. या उपक्रमादरम्यान नवयुगचे संचालक संपतराव शिंदे यांना पंचाहत्तरी निमित्त तसेच माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांना सामाजिक कार्यानिमित्त प्रा. तुकाराम पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाल बडके, अनिकेत गुहे, राज अहेरराव, नेहा कुलकर्णी, अश्विनी कुलकर्णी, उज्ज्वला केळकर, चिंतामणी कुलकर्णी, रजनी अहेरराव, आर. आर. शिंदे, नंदकिशोर बडगुजर, दिलीप क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले.

## पिंपळे गुरवमध्ये प्ले-स्कूल व डे-केअर केंद्रांवर नियमभंगाचा संशय; सर्वेक्षणाची मागणी

पिंपळे गुरव (दै. संध्या)

पिंपळे गुरव परिसरात गेल्या काही वर्षांत निवासी सोसायट्या, रो-हाऊसेस आणि बंगल्यांमध्ये खासगी प्ले-स्कूल, प्री-स्कूल आणि डे-केअर सेंटरची संख्या झपाट्याने वाढली आहे. चिमुकल्यांच्या शिक्षण आणि संगोपनाच्या नावाखाली सुरू असलेल्या या संस्थांपैकी अनेक संस्था आवश्यक परवानग्या, सुरक्षा निकष आणि शासकीय नियमांचे पालन करतात का याबाबत पालक व नागरिकांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.




परिसरातील अनेक भागांत निवासी जागांचे शैक्षणिक संस्थांमध्ये रूपांतर करण्यात आले असून, काही ठिकाणी मोकळ्या खेळाच्या मैदानाऐवजी बंदिस्त जागेतच मुलांचे शिक्षण आणि देखभाल केली जात असल्याचे दिसून येते. बालकांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत का याची पडताळणी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

डे-केअर आणि प्री-स्कूलमध्ये तीन ते सहा वर्षांपर्यंतची लहान मुले मोठ्या प्रमाणावर येत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते अशा संस्थांमध्ये अग्निशामक यंत्रणा, आपत्कालीन बाहेर पडण्याचा मार्ग, सीसीटीव्ही कॅमेरे, स्वच्छ शौचालये, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रशिक्षित कर्मचारी आणि प्राथमिक उपचार सुविधा असणे गरजेचे आहे.

## पिंपरी-चिंचवड महापालिका सभेचे लाईव्ह प्रक्षेपण बंद; सत्ताधाऱ्यांवर नामुष्की

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिका सर्वसाधारण सभेचे कामकाज शहरवासीयांना समजावे म्हणून सत्ताधारी भाजपने सभा कामकाजाचे ऑनलाईन प्रक्षेपण सुरू केले होते. मात्र, ऑनलाईन सभा कामकाजामुळे सत्ताधारीच अडचणीत येत असल्याने तो प्रकार बंद करण्याची नामुष्की सत्ताधाऱ्यांवर ओढवली आहे. त्यामुळे सोमवारी (दि. 15) होणाऱ्या सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण (लाईव्ह) केले जाणार नाही.

महापालिकेत दुसऱ्यांदा भाजपची सत्ता आली आहे. नवे कारभारी महापालिकेत आल्याने सर्वसाधारण सभेचे कामकाज ऑनलाईन केले जावे, अशी मागणी वाढली होती. त्याची दखल घेऊन महापौर रवी लांडगे यांनी आयुक्तांना सभा कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सभागृहाचे कामकाज ऑनलाईन करण्यात येत आहे. सर्वसाधारण सभेचे कामकाज शहरवासीयांना समजावे म्हणून सत्ताधारी भाजपने तो निर्णय घेतला होता.

सभेच्या थेट प्रेक्षपणामुळे नागरिकांसह सामाजिक कार्यकर्ते तसेच, नगरसेवकांच्या समर्थकांना नगरसेवक काय बोलले हे समजत होते. तर, कोणता नगरसेवक कोणत्या विषयावर कसा बोलत आहे, हे ही संपूर्ण शहरासमोर येत होते. तसेच, सभा कामकाजात नगरसेवक किती सहभाग घेतो, हे नागरिकांसह मतदारांना कळत होते. काही नगरसेवक थेट प्रेक्षपणातील स्वतःचा स्वतंत्र व्हिडीओ तयार करून त्याचे रिल्स बनवून सोशल मीडियावर व्हायरल करत होते. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत होता.

ऑनलाईन सभेमुळे फायदा होण्यापेक्षा अनेकदा सत्ताधारी भाजपचे पदाधिकारी अडचणीत सापडले होते.

## विविध भारती म्युझिकल इव्हेंट प्रस्तुत सांगीतिक मैफलीला प्रतिसाद

पिंपरी (दै. संध्या)

प्राधिकरणातील गदिमा नाट्यगृहात विविध भारती म्युझिकल इव्हेंट प्रस्तुत 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे हर जबान पर' या श्रवणीय आणि सुमधुर हिंदी - मराठी चित्रपट गीतांच्या बहारदार सांगीतिक मैफलीला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी दिशा सोशल फाउंडेशनचे संस्थापक - अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, सुचिता शेटे, ॲड. स्मिता शेटे, उषा शेटे, पिंपरी - चिंचवड शिवसेना (शिंदे गट) प्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, नेहा चौधरी, मुकेश चौधरी, विलास गाधडे, मोहन भस्मे, विकास जगताप, पांडुरंग म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी वंदना पगारे यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले. तसेच पीथमपूर बॉम्बे या कंपनीने लॉजिस्टिक्स क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जागतिक दर्जाच्या नेल्सन ग्लोबल कंपनीकडून प्राप्त झालेल्या विशेष पुरस्काराप्रीत्यर्थ स्मिता विजयन, सचिन शेटे, प्रदीप अमोलू आणि विंशा अमोलू यांना विविध भारती म्युझिकल इव्हेंट समूहाच्या वतीने सन्मानित करण्यात आले.



ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांनी गायलेल्या काही लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करीत प्रारंभ करण्यात आलेल्या 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे हर जबान पर' या सांगीतिक मैफलीत नंदकुमार कांबळे, विनायक कदम, राजेंद्र पगारे, शुभांगी पवार, नेहा दंडवते, पंकज कथलकर, सूर्यकांत ताम्हाणे, सुहासिनी कंझरकर, पूनम झांबरे, डॉ. कविता बोंडे, संजय पाटील, विलास खरे, अजय सोलंकी, सतीश कापडी आणि सुनील जोशी या गायक कलाकारांनी आपल्या सुमधुर आवाजात हिंदी व मराठी गीते सादर करून रसिकांची मने जिंकली. रसिक श्रोत्यांनी प्रत्येक गीताला उत्स्फूर्त दाद देत अनेक गाण्यांना 'वन्स मोअर'ची मागणी केली.

'रहे न रहे हम' , 'आज कल तेरे मेरे प्यार के चर्चे हर जबान पर' , 'तुमसे हो हसीना कभी मोहब्बत जो मैंने कर ली थी' , 'जीना क्या अजी प्यार बिना' , 'मेरे मेहबूब कयामत होगी' , 'तुने ओ रंगीले कैसे जादू किया' यांसारख्या गाजलेल्या गीतांसोबतच सादर करण्यात आलेल्या मराठी गीतांनाही श्रोत्यांकडून दाद मिळाली. 'हैं अपना दिल तो आवारा' हे गाणे विलास खरे यांनी माऊथ ऑर्गनवर सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली.

दृकश्राव्य कराओके गीतांच्या या विनाशुल्क मैफलीचे ध्वनिसंयोजन राजेंद्र देसाई यांनी केले; तर विक्रम अंबिके यांनी दृकश्राव्यचित्रण केले. नेहा दंडवते आणि शुभांगी पवार यांनी खुसखुशीत शैलीतून निवेदन केले.

# नगरसेविका पल्लवी वाल्हेकर यांच्या पुढाकारातून वाल्हेकरवाडीत वृक्षारोपण

पिंपरी (दै. संध्या)

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चिंचवड, वाल्हेकरवाडी परिसरात नगरसेविका तथा शिक्षण मंडळ सदस्या पल्लवीताई सुधीर वाल्हेकर यांच्या पुढाकारातून वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात संपन्न झाला. चिंचवड विधानसभेचे कार्यसम्राट आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिवेणी हॉस्पिटलजवळील स्पाईन रोड परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि झपाट्याने होत असलेले शहरीकरण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षणाची जनजागृती व्हावी आणि नागरिकांनी वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत वृक्ष लागवड आणि संवर्धनाचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी आपल्या मनोगतात नगरसेविका तथा शिक्षण मंडळ सदस्या पल्लवीताई सुधीर वाल्हेकर म्हणाल्या, "वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्याचा संकल्प आहे. आज आपण ज्या वेगाने पर्यावरणीय संकटांना सामोरे जात आहोत, त्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण संवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप दिल्यास आपल्या शहराचा हरित विकास निश्चितपणे साध्य होऊ शकतो. विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे ही काळाची गरज आहे. आज लावलेले प्रत्येक रोपटे उद्याच्या पिढीसाठी निरोगी जीवनाचा आधार ठरणार आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक सजग नागरिकाचे कर्तव्य आहे. हरित पिंपरी-चिंचवडच्या निर्मितीसाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी केली जाणार आहे."

यावेळी प्रमुख उपस्थिती असलेले माजी नगरसेवक तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते नामदेवजी ढाके यांनी पर्यावरण संरक्षणासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, "शहराचा वाढता विस्तार आणि कमी होत चाललेली हरितक्षेत्रे ही चिंतेची बाब आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धनाशिवाय दुसरा पर्याय नाही. नागरिक, सामाजिक संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम केल्यास पर्यावरण संरक्षणाची चळवळ अधिक प्रभावी होऊ शकते. आजचा उपक्रम हा केवळ वृक्ष लागवडीपुरता मर्यादित नसून भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे." या उपक्रमास माजी नगरसेवक राजेंद्र साळुंखे, विद्यमान नगरसेविका आशाताई सूर्यवंशी, माजी शिक्षण सभापती श्रीधरभाऊ वाल्हेकर, सामाजिक कार्यकर्ते विलास वाल्हेकर, युवा मंडलाध्यक्ष यश वाल्हेकर, सामाजिक कार्यकर्ते सचिन वाल्हेकर, रूपालीताई वाल्हेकर, कीर्ती परदेशी यांच्यासह नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कडक उन्हाच्या झळातही शेतकऱ्यांकडून मशागतीच्या कामाची लगबग

**काऱ्हाटी (दै. संध्या)**

बारामती तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात खरीप हंगामाची चाहूल लागताच बळीराजा पुन्हा एकदा शेतशिवारात सक्रिय झाला आहे. कडक उन्हात अंगातून घामाच्या धारा वाहत असतानाही शेतकरी खंबीरपणे उभे राहुन पहाटेपासून सायंकाळपर्यंत मशागतीच्या कामात गुंतलेला दिसत आहे.

परिसरातील बहुतांश नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती असून शेतीला पूरक म्हणून दुग्ध व्यवसाय, शेळीपालन केले जातात. मात्र या सर्व व्यवसायांचे आर्थिक गणित शेतीवरच अवलंबून असल्याने निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. असे असले तरी संकटांवर मात करत शेतकरी नव्या हंगामासाठी सज्ज झाला आहे.

पूर्वी बैलजोडीच्या साहाय्याने होणारी मशागत आता आधुनिक यांत्रिकीकरणाकडे वळली आहे. बैलांच्या गळ्यातील घंटांचा मंजूळ आवाज आणि पारंपरिक नांगरणीचे हस्य दुर्मीळ होत चालले असून

त्याजागी ट्रॅक्टरच्या साह्याने संपूर्ण शिवार दणाणून गेले आहे. कमी वेळेत अधिक काम, जास्तीचा खर्च यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टरद्वारे मशागतीला पसंती देत आहेत. खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकरी शेतातील जुने पिकांचे अवशेष हटवणे, नांगरणी, काकरणी, रासायनिक शेण खत शेतात टाकून, बांध दुरुस्ती तसेच पेरणीपूर्व मशागत करत आहेत. तीव्र उन्हाचा सामना करताना त्रास सहन करावा लागत असला तरी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर यंदाच्या खरीप हंगामाबाबत आशेचे समाधान आहेत. खरिपाची मेहनत म्हणजे संसार उभा करण्याची धडपड आहे. जीव तोडून मेहनत करूनही उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी हातबल झाला आहे.

बियाणे, खतांच्या वाढत्या किमतीमुळे बळीराजा हैराण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जाणारा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी केवळ शेतीची तयारी नसून संसार उभा करण्याची धडपड ठरत आहे. बदलते हवामान, बियाणे व खतांच्या वाढत्या किमती, उत्पादन खर्च आणि नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असला तरी यंदा वरुणराजा साथ देईल, या आशेवर बळीराजा नव्या उमेदीने शिवारात उतरला आहे.

शेतकऱ्यांच्या नजरा आता मान्सूनकडे लागल्या असून, वेळेत आणि पुरेसा समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामात चांगल्या उत्पादनाची अपेक्षा व्यक्त होत आहे.



> बियाणे आणि खतांच्या किमती वाढल्या आहे. त्यामुळे शेतीचा खर्चही वाढला आहे. शेतमालाच्या किंमती पेक्षा बियाण्यांच्या किंमती वाढत आहे. मृग नक्षत्रात समाधानकारक पाऊस झाल्यास बाजरी, तूर, मूग, मका आणि सोयाबीनची पेरणी होईल. शेतीची मशागत पूर्ण झाली असून आता वरुणराजाच्या आगमनाची प्रतीक्षा आहे.
>
> - अविनाश काळखैरे, शेतकरी पानसरेवाडी

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भाविकांच्या भक्ती नामघोषाने दुमदुमली चक्रेश्वर नगरी

चाकण (दैनिक संध्या) : टाळ मृदुंगाच्या गजरात, ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत चाकण येथील चक्रेश्वर नगरी भाविकांच्या भक्तीनाम घोषांनी दुमदुमली आहे. अवघा परिसर भक्ती रसात चिंब झाला असून, परिसराला यात्रेचे स्वरूप आले आहे. चाकण येथे श्री चक्रेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ मंडळी चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने अखंड हरिनाम पुरुषोत्तम अधिक मास कीर्तन सोहळा मोठ्या दिमाखात सुरू आहे. चक्रेश्वर मंदिरात नित्याचा काकडा आरती, विष्णु सहस्रनाम, श्री ज्ञानेश्वरी पारायण, भजन, हरिपाठ व हरिजागराचा कार्यक्रम उत्साहात सुरू आहे. याप्रसंगी नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेविका रूपाली कांडगे, उद्योजक राहुल कांडगे, राजेंद्र शिंदे आदी उपस्थित होते. रामदास महाराज तांबे यांनी सांगितले की," संत समाज घडवतात. त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. संतांचा आदर्श घ्या. संस्कृतीला तडा जाऊ न देता माणुसकी आणि नाती जपायला शिका. आजची पिढी व्यसनामुळे बरबाद होत चालली असून, युवकांनी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे. मोबाईलचा अतिरेक टाळा. दुसऱ्याला दोष देण्यापेक्षा प्रत्येकाने आपल्यातील उणिवा शोधल्या पाहिजेत." अन्न प्रसादासाठी पुढाकार घेणाऱ्या चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका रूपाली कांडगे व उद्योजक राहुल कांडगे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.




### शिक्षणाप्रती कृतज्ञता: शाळा सोडताना पालकांकडून पाच हजार देणगी

गलांडवाडी (दैनिक संध्या) : "चांगल्यातील चांगुलपणा जाणण्यासाठी स्वतःच्या अंगीही चांगुलपणा असावा लागतो," याचाच प्रत्यय नुकताच दौंड तालुका गलांडवाडी प्रथमिक शाळेत पाहायला मिळाला. शाळेने दिलेल्या उत्तम संस्कारांची आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कृतज्ञता म्हणून एका पालकाने शाळा सोडताना चक्क देणगी देऊन शिक्षकांना सुखद धक्का दिला आहे. कु. शौर्या दिनेश यादव या विद्यार्थ्याच्या दाखल्यासाठी त्याच्या माता, डॉ. सौ. रत्नमाला यादव फडतरे या शाळेत आल्या होत्या. हडपसर (पुणे) येथे स्थायिक होणे गरजेचे असल्यामुळे अत्यंत जड अंतःकरणाने त्यांनी शौर्याचा दाखला घेतला. शाळा सोडताना त्यांनी भावना व्यक्त केल्या की, "गलांडवाडी शाळेने शौर्यावर अतिशय उत्तम संस्कार केले आणि त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले. आम्हाला ही शाळा सोडण्याची अजिबात इच्छा नव्हती, परंतु परिस्थितीमुळे निरोप घ्यावा लागत आहे." शाळेविषयी वाटणाऱ्या याच आपुलकीपोटी डॉ. रत्नमाला यांनी शाळेच्या विकासासाठी ५,००० रुपयांची आर्थिक मदत (देणगी) विद्यालयात सुपूर्द केली. पालकांच्या या अनपेक्षित आणि कौतुकास्पद निर्णयामुळे उपस्थित सर्व शिक्षक भारावून गेले होते. या छोटेखानी कृतज्ञता सोहळ्याप्रसंगी शौर्याचे आजोबा श्री. विजय कृष्णजी फडतरे आणि शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. पालकांच्या या दातृत्वाचे आणि कृतज्ञतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### मोरगावात सोमवती अमावास्येनिमित्त श्री मयूरेश्वरांचा पारंपरिक ऊर्ध्ववचन सोहळा

मोरगाव (दैनिक संध्या) : अष्टविनायकांपैकी प्रथमपूज्य मानल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र मोरगाव येथे सोमवती अमावास्येनिमित्त सोमवारी (दि. १५) श्री मयूरेश्वराच्या मूर्तीस कऱ्हा नदीतीरी पारंपरिक ऊर्ध्ववचन अर्थात स्नान घालण्याचा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. आध्यात्मिक आणि धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्व असलेल्या या प्राचीन परंपरेचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. सध्या भारतीय पुरातत्व विभागाकडून श्री मयूरेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असल्याने मंदिर सर्वसामान्य भाविकांसाठी बंद आहे. तरीही मंदिर संस्थानच्या नियोजनानुसार शेकडो वर्षांची परंपरा असलेला पालखी सोहळा यथाविधी पार पाडण्यात येणार आहे.

## पुरंदर तालुका मनसेचा उपक्रम; राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित 1 लिटर पेट्रोल मागे 10 रु सूट

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या वाढदिवसा निमित पुरंदर तालुका मनसेच्या वतीने जेजुरीत एक लिटर पेट्रोल मागे दहा रुपयांची सूट हा उपक्रम राबविण्यात आला.

पुरंदर तालुका मनसेच्या तालुका अध्यक्ष उमेश जगताप यांच्या वतीने पुरंदर तालुक्यातील प्रत्येक दुचाकी व चारचाकी वाहनांना पेट्रोलसाठी एका लिटर मागे दहा रुपयांची सूट हा उपक्रम राबविण्यात आला. वाहन चालकांनी या उपक्रमाचे स्वागत करून प्रतिसाद दिला

जेजुरी येथील एका पेट्रोल पंपावर या उपक्रमाच्या उद्घाटन मनसेचे तालुका अध्यक्ष उमेश जगताप, पदाधिकारी गणेश कुंभार, श्रेयस जगताप, अविनाश बारभाई, उत्तम झगडे, रोहन जगताप आदी उपस्थित होते.

पुरंदर तालुका मनसेच्यावतीने दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके शालेय साहित्य वाटप, पाणी टंचाई काळात, टँकर व जारच्या माध्यमातून पिण्याचे पाणी वाटप, पूरग्रस्त भागात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप आदी उपक्रम राबविण्यात आले आहेत.

उमेश जगताप यांनी गेली पंधरा वर्षात सुमारे एक हजारहून अधिक अपघात ग्रस्तांना हॉस्पिटल मध्ये दाखल करून अनेकांचे प्राण वाचविले आहेत. तसेच पुरंदर तालुक्यातील बेलसर जवळील टोल नाक्यावर स्थानिकांना टोल आकारू नये यासाठी मनसेच्या वतीने आंदोलन केले आहे.




## मंचरमध्ये ४८ सागवृक्षांचा बेकायदा साठा; वन विभागाची मोठी कारवाई

**मंचर (दै. संध्या)**

कोलतावडे (ता. आंबेगाव) येथील वृक्षतोडीप्रकरणी विनापरवाना वाहतूक करण्यात आलेल्या ४८ सागवृक्षांचा साठा मंचर (ता. आंबेगाव) येथील गजानन आरागिरणीच्या आवारात आढळला. त्यामुळे वन विभागाने संबंधित आरागिरणी शुक्रवारी (दि. १२) सील केली.

वन विभागाकडून करण्यात आलेल्या तपासात कोलतावडे परिसरातील वृक्षतोडीनंतर ४८ सागवृक्षांची विनापरवाना वाहतूक करण्यात आल्याचे निष्पन्न झाले होते. या वृक्षांचा साठा मंचर येथील गजानन आरागिरणीच्या आवारात करण्यात आल्याचेही तपासात पुढे आले.

याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची दखल घेत उपवनसंरक्षक जुन्नर यांनी संबंधित आरागिरणी तत्काळ बंद करण्याचे आदेश मंचर वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार शुक्रवारी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कारवाई करून सदर आरागिरणी बंद केली. वनसंपत्तीचे संरक्षण करण्यासाठी विनापरवाना वृक्षतोड, वाहतूक व साठा करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा वन विभागाने दिला आहे.



## बी.बी.एफ.च्या आधारे पेरणी करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी बी.बी.एफ. (रुंद सरी वरंभा पद्धत) या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे पेरणी करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवासाठी कृषी विभागाच्या वतीने "खरीप हंगाम पूर्व नियोजन मोहीम" राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आधुनिक पद्धतीने पेरणी,प्रात्यक्षिके,कृषी मार्गदर्शन सुधारित बियाणे, खतांचे संतुलित व्यवस्थापन, पीक संरक्षण, तसेच जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

बदलत्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीत बदल करून पेरणीसाठी स्वतः बी.बी.एफ तंत्र तयार करून त्याद्वारे पेरणी करावी असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात येत आहे.

या बी.बी.एफ. तंत्रपद्धतीमध्ये रुंद वाफे आणि सऱ्या तयार करून पेरणी केली जाते. या तंत्रज्ञानामुळे पेरणी करताना बेड तयार होतो. व दोन्ही बाजूला सरी पडते. त्यामुळे पावसाचे अतिरिक्त पाणी सऱ्यांमधून निचरा होण्यास मदत होते, तसेच जमिनीत आवश्यक ओलावा टिकून राहतो. त्यामुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत मिळते.बाजारभाव आपल्या हातात नसले तरी उत्पादन खर्च कमी करून आर्थिक उन्नती साधता येते.

तसेच अतिवृष्टी किंवा अनियमित पावसाच्या परिस्थितीतही पिकांचे नुकसान कमी करण्यास या तंत्रज्ञानाचा फायदा होतो. तसेच पाणी, खत आणि मजुरी खर्चात बचत होऊन शेती अधिक फायदेशीर बनते

खरीप हंगामातील पिके विशेषता सोयाबीन, तूर, हरभरा, मका यांसारख्या पिकांसाठी ही पद्धत उपयुक्त मानली जाते. खेड तालुक्यात १४ हजार ७०० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिके घेतली जातात.तर भात ७ हजार हेक्टर क्षेत्र,आणि मका ४ हजार ७०० इतके क्षेत्रावर खरीप हंगामात पिके घेतली जातात. जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी पाऊस लांबणीवर गेल्याने पेरणी देखील लांबणीवर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पावसाच्या आगमनापूर्वी खरीप हंगासाठी सज्ज राहण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.



## कारमधून १ लाख ३५ हजारांची रोकड पळवली

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

बँकेतून पैसे काढल्याची पाळत ठेवुन कदमवाकस्ती ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट परिसरातील वजन तपासणी केंद्राच्या पार्किंगमध्ये उभी असलेल्या कारच्या डॅशबोर्डमधून अज्ञात चोरट्याने १ लाख ३५ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना शुक्रवार (१२ जून) रोजी दुपारच्या सुमारांस घडली आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी श्रीकांत राजेंद्र सुंबे (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुंबे यांचा 'सिद्धी ट्रान्सपोर्ट' या नावाने पेट्रोल टँकरचा व्यवसाय आहे. त्यांनी कदमवाकस्ती येथील युनियन बँकेच्या शाखेतून दीड लाख रुपये काढले होते. त्यांनी सदर रक्कम त्यांच्या हुंडाई क्रेटा कार क्रमांक एमएच १२ डब्ल्यूके ५३९० च्या डॅशबोर्डमधील कप्प्यात ठेवली होती. यातील १५ हजार रुपये कवडीपाट येथील 'परफेक्ट कॅलिब्रेशन' केंद्रात देण्यासाठी ते आपल्या भावासह तेथे गेले. दुपारी सुमारे १.१० वाजण्याच्या सुमारांस तेथे कार पार्क करून दोघेही कार्यालयात गेले. काही वेळानंतर परत आल्यानंतर त्यांनी डॅशबोर्ड तपासला असता त्यामधील उर्वरित १ लाख ३५ हजार रुपयांची रोकड तेथे नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यानंतर त्यांनी तात्काळ '११२' क्रमांकावर फोन करून पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून, अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पीएम कुसुम योजनेअंतर्गत सौर कृषीपंप प्रलंबित आस्थापना व तक्रार निवारण कार्यशाळेस प्रतिसाद

**बारामती (दै. संध्या)**

महाऊर्जा विभागीय कार्यालय, पुणे यांच्या वतीने आज दि. १२ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता कृषी विभाग फळ रोपवाटिका, कऱ्हेरी, ता. बारामती, जि. पुणे येथे प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान (पीएम-कुसुम) योजनेअंतर्गत प्रलंबित सौर कृषीपंप आस्थापना गतीमान करणे तसेच लाभार्थी शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्याच्या उद्देशाने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेस बारामती, इंदापूर व दौंड तालुक्यातील ज्या लाभार्थी शेतकऱ्यांचे सौर कृषीपंप अद्याप बसविण्यात आलेले नाहीत अथवा बसविण्यात आलेले असले तरी ते कार्यान्वित नसल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत, अशा लाभार्थ्यांना विशेषतः निमंत्रित करण्यात आले होते.

कार्यशाळेस महाऊर्जा विभागीय कार्यालय, पुणे येथील विशाल सावंत उपस्थित होते. तसेच पीएम-कुसुम योजनेअंतर्गत कार्यरत पुरवठादार कंपन्यांचे प्रतिनिधी सौरभ खांडेकर, पांडुरंग किसवे (पर्ल एंटरप्राइजेस), अक्षय बोराटे, दादा खारतोडे आणि बालाजी पाटील यांनी सहभाग नोंदविला.

कार्यशाळेदरम्यान उपस्थित लाभार्थी शेतकऱ्यांच्या विविध तक्रारी, अडचणी व सूचना यांची सविस्तर नोंद घेण्यात आली. प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्रपणे आढावा घेऊन संबंधित पुरवठादार कंपन्यांना प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या तसेच तांत्रिक अडचणी दूर करून सौर कृषीपंप कार्यान्वित करण्याच्या सूचना महाऊर्जा कार्यालयामार्फत देण्यात आल्या.

यावेळी शेतकरी, पुरवठादार कंपन्या आणि महाऊर्जा कार्यालय यांच्यात समन्वय साधून लाभार्थ्यांच्या समस्यांचे जलद व प्रभावी निराकरण करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. अशा प्रकारच्या समन्वयात्मक कार्यशाळांमुळे सौर कृषीपंपांची प्रलंबित आस्थापना पूर्ण होण्यास गती मिळणार असून, कार्यान्वित सौर कृषीपंपांचा शेतकऱ्यांना अधिक प्रभावीपणे लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

तसेच सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर, सिंचनासाठी अखंडित व स्वस्त ऊर्जा उपलब्धता आणि शेती उत्पादन खर्चात बचत यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थित शेतकरी, पुरवठादार कंपन्यांचे प्रतिनिधी आणि महाऊर्जा कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.




## चाकण बाजारात कांदा, बटाटा, हिरवी मिरची व टोमॅटोची प्रचंड आवक

**चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कांदा, बटाटा, टोमॅटो, हिरवी मिरची व गाजराची प्रचंड आवक झाली. दोडका, चवळी, भेंडी, वालवड व फरशी यांचे भाव तेजीत राहिले. फळभाज्या व पालेभाज्यांचे भाव वधारले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ८० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार ५०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,००० ते १,८०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक २,००० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक २५ क्विंटल झाली. लसणाला १३ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३२५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार ५०० रुपयांपासून ते ४ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक - १.१,८०० रुपये, भाव क्रमांक २.१,३०० रुपये, भाव क्रमांक ३.१,०००. बटाटा - एकूण आवक - २,००० क्विंटल.भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.९०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३१५ क्विंटल (२,००० ते ३,००० रू.), कोबी - १८० क्विंटल (१,५०० ते २,००० रू.), फ्लॉवर - २१० क्विंटल (१,००० ते २,००० रु.), वांगी - ११६ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), भेंडी - ६९ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), दोडका - ५९ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), कारली - ६५ क्विंटल ( ४,००० ते ५,००० रु.), दुधीभोपळा - ६२ क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), काकडी - १०८ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), फरशी - २४ क्विंटल (५,००० ते ७,००० रु.), वालवड - ८ क्विंटल (८,००० ते १०,००० रुपये), ढोबळी मिरची - १४८ क्विंटल (४,००० ते ६,००० रु.), चवळी - ३२ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), वाटाणा - ३० क्विंटल (६,००० ते ८,००० रू. ), शेवगा - ३२ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), गाजर - ११० क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), गवार - ७८ क्विंटल (३,००० ते ६,००० रु.).






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे



### मोदी अमेरिकेसमोर नतमस्तक : प्रकाश आंबेडकर

मुंबई (दैनिक संध्या) : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अत्यंत टोकदार शब्दांत हल्लाबोल केला आहे. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका X पोस्ट (ट्विट) मधून आंबेडकर यांनी अमेरिकेतील घटनांवर भारत सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मोदींना थेट लक्ष्य केले. आंबेडकर म्हणाले की, "कोणत्याही स्वाभिमानी देशाच्या पंतप्रधानांनी आपल्या तीन नागरिकांच्या मृत्यूबाबत अमेरिकेकडे जाब विचारला असता, अमेरिकेला जबाबदार धरले असते आणि कठोर पावले उचलली असती. मात्र नरेंद्र मोदी तसे करत नाहीत." मोदींवर अधिक टीका करताना त्यांनी म्हटले की, "मोदी हे संकटाच्या वेळी बिळात लपणाऱ्या उंदरासारखे वागतात. अन्यथा ते परदेश दौऱ्यांवर जाऊन टॉफी-चॉकलेट वाटण्यात व्यस्त असतात." अमेरिकेबाबत भारत सरकारची भूमिका अत्यंत लाचार असल्याचा आरोप करत आंबेडकर म्हणाले, "मोदी अमेरिकेच्या तालावर मुजरा करत आहेत. त्यांच्या धोरणांमुळे भारत पुन्हा एकदा गुलाम देश बनत आहे." या वक्तव्यात आंबेडकर यांनी मोदींना उद्देशून वारंवार "मोदी एक चूहा हैं" अशी टीका केली असून, त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

### ग्राहकांच्या तक्रारींमध्ये स्मार्ट मीटरमुळे मोठी घट

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यात महावितरणतर्फे आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रिडिंग होते. राज्यात स्मार्ट मीटरचे प्रमाण वाढल्यानंतर ग्राहकांच्या वीजबिलाच्या तक्रारी खूप कमी झाल्या आहेत. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर संबंधित ग्राहकाला मोबाईल अॅपद्वारे दर तासाला त्याचा वीज वापर मोबाईल फोनवर समजतो. त्यामुळे वीजबिलाबाबत पारदर्शिता राहते. स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. स्मार्ट मीटरच्या अॅपद्वारे ग्राहकाला त्या घरात अथवा कार्यालयात अर्थिंगची समस्या अथवा वीजगळती होत असल्यास समजते. त्या माहितीचाही ग्राहकाला लाभ होतो. ग्राहकाने कोणत्या वेळेला किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते. याशिवाय मोबाईल अॅपद्वारे बिल भरल्यास डिजिटल पेमेंटची सवलत आणि गो ग्रीनची दरमहा दहा रुपये सवलत मिळते.

### 'श्रीमती सुकेशिनी तेलगोटे यांचे निलंबन करावे'

मुंबई (दैनिक संध्या) : नागपूर येथील एका दैनिकात सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेश बाबतीत मांग व मेहतर या समाजाला विशेष प्राधान्य जाहिरात देवून 57 मागासवर्गीय घटकात खळबळ उडाली असून शासन फक्त मांग मेहतर समाजाला प्राधान्य कसे देऊ शकते याचा जाहिर निषेध करण्यात येत तर आहेच.परंतु ऐन उपवर्गिकरण बाबतीत होत असलेला मांग विरोधी 58 जाती घटकात जो संघर्ष शिगेला पोहचला त्यात तेल टाकणारी ही जाहिरात आहे आणि आताच ही जाहीर का हा तेलगोटे यांचा काय हेतू आहे म्हणून सरकारने सुकेशिनी तेलगोटे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते समाजभूषण उत्तमराव गायकवाड यांनी एका पत्रकाद्वारे महाराष्ट्र सरकारला केली आहे. ही जाहिरात उपवर्गिकरण वादादित संघर्षात तेल ओतावे म्हणून प्रकाशित होणारी जाहिरात टाकताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ व विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदिप कांबळे यांची किंवा ईतर वरिष्ठ अधिकारी यांची परवानगी घेतली होती का याचीही चौकशी झाली पाहिजे अशीही मागणी उत्तमराव गायकवाड यांनी केली आहे. सरकारला या जाहिरातीमुळे मागासवर्गीय घटकात संघर्ष घडवून आणायचा आहे.

# राज्यातील अपुऱ्या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर; ३१ ऑगस्ट पर्यंत पिण्याचा पाणी पुरवठा निश्चित करावा - राधाकृष्ण विखे पाटील

पुणे (दै. संध्या)



राज्यातील अपुऱ्या पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर तसेच धरणातील उपलब्ध पाणीसाठा विचारात घेवून ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहे. बेकायदेशिर पाणी उपश्यावरही तातडीने कडक कारवाई करण्याच्या सुचना त्यांनी विभागाच्या आधिकाऱ्यांना दिल्या.

सिंचन भवनामध्ये जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत कृष्णा व गोदावरी लाभक्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या धरणांमधील पाणीसाठा, अगामी मान्सुनची परिस्थिती या संदर्भात महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनमंत धुमाळ, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयवंत गवळी यांच्यासह मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

सद्य परिस्थितीत राज्यातील धरणांमधील एकुण उपयुक्त जलसाठा ३५७.५ टिएमसी (२५ टक्के) असून, तो गतवर्षीच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आले. यावर्षीचे पर्जन्यमान आता पर्यंत अत्यल्प झाल्यामुळे धरणात पाणी आले नाही हे त्यामागील प्रमुख कारण आहे. विशेषत: पुणे विभागातील उपयुक्त जलसाठा गतवर्षीच्या तुलनेक कमी असल्याने परिस्थिती गांभिर्याने हाताळावी असे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिले.

पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगर क्षेत्रातील सुमारे ८५ लाख नागरीकांना ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध राहण्यासाठी आवश्यक असलेले पाणी राखीव ठेवण्याच्या सुचना या बैठकीत मंत्र्यांनी प्राधान्याने दिल्या आहेत. मराठवाडा आणि कृष्णा महामंडळाच्या अंतर्गत येणारे सर्व धरणं, जलाशय व प्रमुख जलस्त्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा, त्यावर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा विचार करुन पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक राखीव कोटा निश्चित करण्याबाबतही बैठकीत जलसंपदा मंत्र्यानी सुचित केले. जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी, महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पाणीपुरवठा यंत्रणा यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून पाणी व्यवस्थापनाचा कृती आराखडा तातडीने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले.

नाशिक, अहिल्यानगर व मराठवाडा विभागातील जलसाठ्याचा आढावा घेताना नाशिक विभागात सध्या २६ टक्के तर मराठवाडा विभागात २८ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध असून, दोन्हीही विभागातील प्रकल्पांमध्ये अपेक्षित प्रमाणात पावसाची नोंद झालेली नाही. विशेषत: मराठवाडा आणि अहिल्यानगर विभागात पिण्याच्या पाण्याच्या गरजांना प्राधान्य देवून उपलब्ध जलसाठ्याचे काटेकारपणे नियोजन करण्याबातही गांभिर्याने कार्यवाही करण्यास आधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे.

नाशिक, अहिल्यानगर, पुणे, मराठवाडा विभागातील जलशयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची नवीन आवक सुरु होईपर्यंत असलेल्या पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा. अगामी मान्सुनच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करतानाच पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ग्रामीण व शहरी भागातील टंचाई निवारण आणि जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यावर भर देण्याबातही बैठकीत ठरविण्यात आले.

अहिल्यानगर जिल्ह्यासह गोदावरी खोऱ्यातील विविध प्रकल्पांची स्थिती लक्षात घेता स्थानिक प्रशासन, जलसंपदा विभाग व पाणीपुरवठा यंत्रणांनी समन्वयाने काम करुन पाण्याचे नियोजन करावे, उपलब्ध जलसाठ्याचा वापर अत्यावश्यक गरजांसाठी करण्याबाबत जनजागृती करण्याचे आवाहनही मंत्री विखे पाटील यांनी या बैठकीत आधिकाऱ्यांना केले आहे.

उपलब्ध पाण्याचा वापर सर्वप्रथम पिण्यासाठी करण्यात यावा, बेकायदेशिर पाणी उपसा रोखण्यासाठी विशेष माहीम राबवण्यासाठी महसूल, पोलिस आणि जलसंपदा विभाग यांच्या संयुक्त पथकांमार्फत कठोर करावाई करण्याबाबतही स्पष्ट आदेश मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिले आहेत.

## नाशिक जिल्ह्यात दोन महत्वाच्या सर्वेक्षणांचा शुभारंभ

### रोजगार, बेरोजगारी व असंघटित क्षेत्राची अचूक माहिती संकलित होणार


नाशिक (दै. संध्या)



राज्यातील रोजगार, बेरोजगारी, महिला कामगार सहभाग तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांची अद्ययावत व विश्वासार्ह माहिती उपलब्ध व्हावी यासाठी जून ते डिसेंबर २०२६ या कालावधीत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (PLFS) आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण (ASUSE) या दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणे राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात ही दोन्ही सर्वेक्षणास सुरूवात झाली असून या सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले आहे. जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात या सर्वेक्षण मोहिमेचा शुभारंभ झाला. यावेळी, सह आयुक्त सरिता यादव, उप आयुक्त जयवंत आढाव, जिल्हा नियोजन अधिकारी विजय शिंदे, सांख्यिकी अधिकारी (निवृत्त) कुंदन कांबळे उपस्थित होते. सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय (MoSPI), भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक बँकेच्या सहाय्याने आणि महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या MahaSTRIDE प्रकल्पांतर्गत ही सर्वेक्षणे करण्यात येत आहेत. या सर्वेक्षणातून प्राप्त होणाऱ्या आकडेवारीचा उपयोग शासनाच्या विविध विकासात्मक योजना, धोरणे आणि नियोजन प्रक्रियेसाठी केला जाणार आहे. PLFS सर्वेक्षणाद्वारे रोजगार व बेरोजगारीची स्थिती, महिला कामगारांचा सहभाग, स्वयंरोजगार आणि असंघटित रोजगार यासंदर्भातील अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे. तर ASUSE सर्वेक्षणाद्वारे उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील (बांधकाम क्षेत्र वगळून) असंघटित उद्योग आस्थापनांची संख्या, रोजगाराचे प्रकार, कार्यरत कामगारांची संख्या, उत्पादकता, वेतन आणि स्थूल मूल्यवर्धन (GVA) यांसारख्या महत्त्वपूर्ण आर्थिक निर्देशकांची माहिती संकलित केली जाणार आहे.

## सरकारी कार्यालयांसाठी एअर इंडिया इमारतीला १८१ कोटींची झळाळी, सहा महिन्यात काम पूर्ण होणार

मुंबई (दै. संध्या)



सरकारच्या विविध विभागांच्या कार्यालयासाठी आता नरिमन पॉइंट येथील एअर इंडियाची २२ मजली इमारत उपलब्ध झाली आहे. इमारत ताब्यात घेतल्यानंतर या इमारतीची संरचनात्मक तपासणी करण्यात आली असून आता या इमारतीला नवी झळाळी दिली जाणार आहे. या नूतनीकरणासाठी १८१ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून सहा महिन्यांत हे काम पूर्ण होणार आहे.

एअर इंडिया इमारत राज्य सरकारने नुकतीच १ हजार ६०१ कोटी रुपये मोजून खरेदी केली. इमारतीची खरेदी प्रक्रिया पूर्ण होऊन इमारत ताब्यात आल्यानंतर सरकारने इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती, नूतनीकरण आणि विद्युतीकरणाच्या कामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपवली आहे. त्यासाठी विभागाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळून वित्त विभागाने निधी मंजूर केल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे यांनी दिली. एअर इंडिया इमारतीसाठी स्थापत्य आणि विद्युतीकरण अशा दोन स्वतंत्र निविदा काढण्यात येतील. निविदा काढण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून इमारत नूतनीकरणाचे काम सहा महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. स्थापत्य कामात इमारतीची दुरुस्ती, सजावट, नवे फर्निचर आणि रंगरगोटीचा समावेश आहे. तर विद्युतीकरणात नव्या लिफ्ट, विद्युत उपकरणे बसवणे यांचा समावेश असल्याचे नागरगोजे यांनी सांगितले.

## योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी - मंत्री रावल

मुंबई (दै. संध्या)



योग ही भारताने जगाला दिलेली सर्वात मौल्यवान देणगी आहे. योग केवळ शारीरिक व्यायाम नसून शरीर, मन आणि आत्मा यांच्यात सुसंवाद निर्माण करणारी जीवनपद्धती असल्याचे प्रतिपादन पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आज केले. आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 च्या पार्श्वभूमीवर सर्व देशांच्या महावाणिज्यदूत व मानद वाणिज्यदूतांसाठी आयोजित केलेल्या विशेष योग सत्राच्या उदघाट्नप्रसंगी ते बोलत होते.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राजशिष्टाचार विभाग आणि कैवल्यधाम योग संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मरीन ड्राईव्ह येथील संस्थेच्या सभागृहात शनिवारी सकाळी हे विशेष सत्र उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. मंत्री श्री रावल यांच्या हस्ते योग सत्राचे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक शंखनादाने करण्यात आली. त्यानंतर कैवल्यधाम संस्थेचे विश्वस्त निवित श्रीवास्तव यांनी मंत्री जयकुमार रावल यांचे स्वागत केले. कैवल्यधाम या भारतातील सर्वात जुन्या योग संशोधन व शिक्षण संस्थेचे संस्थापक स्वामी कुवलयानंद यांच्या प्रतिमेस मंत्री श्री रावल आणि मान्यवरांनी पुषार्पण केले.

यावेळी मंत्री श्री रावल म्हणाले, आंतरराष्ट्रीय योग दिनाला संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेली जागतिक मान्यता ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे. देशांचे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे योगाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

विविध देश, संस्कृती आणि परंपरांतून आलेल्या समाजास आरोग्य, शांतता आणि आनंद या समान मूल्यांनी जोडण्याचे सामर्थ्य योगामध्ये आहे. योगाच्या शास्त्रीय परंपरेचे जतन आणि प्रसार करण्यासाठी कैवल्यधाम संस्थेने केलेल्या शतकोत्तर कार्याचे कौतुक त्यांनी यावेळी केले.

## ठाण्यात अवैध 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल' साठ्यावर धाड; १.२० कोटींचा मुद्देमाल जप्त

ठाणे (दै. संध्या)

अंबरनाथ तालुक्यात उसाटणे परिसरात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'च्या मोठ्या साठ्यावर राज्य दक्षता पथकाने रविवारी धडक कारवाई करत सुमारे एक कोटी २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणात संबंधित आरोपींविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अवैध इंधन साठवणूक आणि काळाबाजाराविरोधातील ही महत्त्वपूर्ण कारवाई मानली जात आहे.

नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे राज्य दक्षता पथकाने अंबरनाथ येथील उसाटणे भागातील न्यूओ लॉजिस्टिक पार्क परिसरात, राज्यस्तरीय प्लॉट क्रमांक २० समोर छापा टाकला. कारवाईदरम्यान टँकरचे सील तोडून 'मिक्स हायड्रोकार्बन ऑईल'ची बेकायदेशीर साठवणूक व देवाणघेवाण सुरू असल्याचे उघडकीस आले. तपासणी केली असता GJ-12 BY-7560 क्रमांकाचा टँकर पूर्णपणे भरलेला आढळला. या टँकरमध्ये सुमारे २९ हजार ७०० किलो मिक्स हायड्रोकार्बन ऑईल असल्याचे निदर्शनास आले. तसेच MH-43 E-190 क्रमांकाचा आणखी एक टँकर घटनास्थळी उभा असून त्यामध्ये इलेक्ट्रिक मोटारीच्या सहाय्याने इंधन साठवण्याचे काम सुरू असल्याचे आढळले.




## गोटपॉक्स लसीकरण मोहिमेला वेग

नाशिक (दै. संध्या)

राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पी चर्मरोगापासून (Lumpy Skin Disease – LSD) सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी आवश्यक गोटपॉक्स लसमात्रांच्या उत्पादनाला वेग देण्यात आला असून, पहिल्या टप्प्यात एकूण उत्पादनाच्या ४० टक्के म्हणजेच ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे नियोजनबद्ध वाटप सुरू करण्यात आले आहे. राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर आणि तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. राज्यातील लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुणे येथील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेमार्फत आवश्यक गोटपॉक्स लसींचे उत्पादन सुरू करण्यात आले आहे. २१ व्या पशुगणनेनुसार राज्यातील जिल्हानिहाय गायवर्ग पशुधनाची संख्या विचारात घेऊन लसमात्रांचे नियोजनबद्ध वाटप करण्यात येत आहे.

या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. लसींची वाहतूक व साठवणूक करताना शीतसाखळी व्यवस्थापनात कोणताही खंड पडू नये, याची विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच गोटपॉक्स लसमात्रा प्राप्त होताच जिल्ह्यातील अधिक दूध उत्पादन देणाऱ्या आणि उच्च उत्पादनक्षमतेच्या पशुधनाचे प्राधान्याने लसीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. मोहिमेच्या प्रगतीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित अहवाल प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना लसीकरण मोहिमेचा विहित नमुन्यातील दैनंदिन एकत्रित अहवाल दररोज सकाळी ११ वाजेपर्यंत सादर करण्याच्या सूचना पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याहयाखान पठाण यांनी दिल्या आहेत.

गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळून आला होता, त्या तालुक्यांमध्ये प्राधान्यक्रमाने लसीकरण मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या व्यापक मोहिमेत जिल्ह्यातील सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था, खाजगी पशुवैद्यक आणि पशुसेवादाते यांचे सक्रिय सहकार्य घेण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

लंपी चर्मरोगासारख्या संसर्गजन्य आजारांपासून राज्यातील गोधनाचे संरक्षण करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि शेतकरी बांधवांच्या उपजीविकेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी गोटपॉक्स लसीकरण हा सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय असून ही मोहीम क्षेत्रीय स्तरावर व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. पशुपालकांनीही विभागास सक्रिय सहभागातून सहकार्य करावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. पाटील यांनी केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गरीब विद्यार्थ्यांसाठी मुक्ताई वसतिगृहाचा आधार; लक्ष्मण कदम यांचा उपक्रम

पुरंदर (दैनिक संध्या) : जयहरी फाऊंडेशन संचालित मुक्ताई वसतिगृह, पिंगोरी (ता. पुरंदर) येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच राहण्याची व भोजनाची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक /अध्यक्ष लक्ष्मण कदम यांनी आपल्या मनोगतातून दिली. मुक्ताई वसतिगृहामध्ये आश्रमशाळा सुरू करण्यात आली असून ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास संस्थेच्या संचालिका नंदा कदम, पोपट सकुंडे, माऊली सकुंडे, वाघेश्वरी माध्यमिक विद्यालय पिंगोरीचे मुख्याध्यापक शांताराम राणे, पत्रकार चंद्रकांत चौंडकर, पारितोषिक प्राप्त शिक्षक विष्णू चौधरी, बाळासाहेब शिंदे, कालिदास शिंदे, दिगंबर शिंदे,पालकवर्ग तसेच नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थी संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करण्यात आले तसेच त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागतामुळे वसतिगृह परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



### भोसे येथील शिक्षकाने दिला पिण्याच्या पाण्यासाठी मदत निधी

चाकण (दैनिक संध्या) : पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल घेण्याकरता येथील एका शिक्षकाने आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून भोसे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला भरीव मदत निधी दिला. खेड तालुका प्राथमिक संघाचे माजी सभापती व भोसे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेचे माजी विद्यार्थी आणि सध्या या शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत असलेले तुकाराम रामचंद्र कुटे यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा योग साधला. भोसे येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून शाळेत नव्याने बोअरवेल घेण्याकरिता चक्क ५१ हजार रुपये दिले. याप्रसंगी उद्योजक किरण टिळेकर, रमेश लोणारी, निवृत्ती गांडेकर, तुकाराम कुटे ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शिक्षक पालक व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पोलीस निरीक्षक नारायण पवार अ‍ॅक्शन मोडवर

बारामती (दैनिक संध्या) : रोडरोमिओंना चाप, विरोधाचे गुन्हे व प्रॉपर्टीविषयी गुन्ह्यांना बारामती पोलिसांकडून प्रतिबंध घालण्याचे दृष्टिकोनातून पाई पेट्रोलिंग करण्यात आले.बारामती शहरात रोड रोमीओंकडून महिलांना त्रास होऊ नये तसेच महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रांची चोरी होऊ नये तसेच इतर चोऱ्या होऊ नयेत व शरीराविरुद्धचे गुन्हे घडू नयेत या दृष्टिकोनातून तसेच रस्त्याची होणारी कोंडी तसेच रस्त्यावर होणाऱ्या पार्किंग अतिक्रमण या दृष्टिकोनातून बारामती पोलीसांकडून संध्याकाळी सहा ते आठ या वेळेत पाई पेट्रोलिंग करण्यात आले. रस्त्यावर जर कोणी बेशिस्तपणा, उनाडगिरी, भाईगिरी केली तर त्याची खैर नाही. यापुढे अशा लोकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.



## उरुळी कांचन शवविच्छेदन गृहातील धक्कादायक प्रकार

# मृतदेहावर मुंग्यांचा विळखा, नातेवाईक संतप्त

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

उरुळी कांचन येथील शवविच्छेदन गृहातील गंभीर हलगर्जीपणाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मनेष शांताराम कांचन वय ४० रा. कुंभारआळी यांचा शुक्रवार (ता. १२ जून) रोजी गळफास घेऊन मृत्यू झाला होता. मृत्यू झालेल्या व्यक्तीचा मृतदेह तब्बल दहा तास शवविच्छेदन गृहात पडून राहिल्याने त्याच्या तोंड, नाक, डोळे आणि कानांमध्ये मुंग्या लागल्या होत्या.

मिळालेल्या माहितीनुसार मनेष कांचन यांचा शुक्रवार (ता. १२ जून) रोजी गळफास घेऊन मृत्यू झाला होता. रात्री सुमारे १२ वाजण्याच्या दरम्यान त्यांचा मृतदेह शवविच्छेदन गृहात आणून मृत्यूदेहची सर्व कपडे काढून उघडा करून शवविच्छेदेनेसाठी ठेवण्यात आला. मात्र रात्रभर आणि सकाळपर्यंत शवविच्छेदन न झाल्याने मृतदेहाची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती.




सकाळी नऊ वाजेपर्यंत शवविच्छेदन करण्यासाठी कोणी डॉक्टर न आल्याने नातलगांनी शवविच्छेदनामध्ये ठेवलेला मृतदेह पाहिला. त्यावेळी मृतदेहाच्या चेहऱ्यावर तोंडात, नाकात, डोळ्यात, कानामधे मुंग्या लागल्या होत्या. नातलगांनी मृतदेहाची ही हेळसांड विटंबना पाहून डॉक्टरांबद्दल संताप व्यक्त केला.

तसेत रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान शव विच्छेदन गृहात ठेवलेला मृतदेह सकाळी १० वाजेपर्यंत तसाच पडून असल्याने नातेवाईकांनी उरुळी कांचन प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रशासनाला जाब विचारला. मात्र प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी एकमेकांवर जबाबदारी ढकलत असल्याचा नातलगांनी आरोप केला आहे. या घटनेमुळे उरुळी कांचन परिसरात संतापाची लाट उसळली असून, शवविच्छेदन गृहातील व्यवस्थापन आणि आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसेच हलगर्जीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर आरोग्य अधिकारी कारवाई करणार का असा प्रश्न उपस्थितीत केला आहे. तसेच प्रशासन दखल घेणार का? अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

गेल्या काही दिवसापूर्वीच सांयकाळी एक महिलेचा मृतदेह उरुळी कांचन येथील शवविच्छेदनासाठी आला होता. त्यावेळी डॉक्टरांना आणण्यासाठी मृतदेहाच्या नातलगांना मागणी केली होती . अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी उरुळी कांचन प्राथमिक आरोग्य केंद्रातील शव विच्छेदनाच्या डॉक्टरांबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

शवविच्छेदनाआधीच मृतदेहाची दुर्दशा, डॉक्टर कुठे गायब? १० तास मृतदेह पडून मुंग्यांनी केला ताबा, मृतदेहाच्या नातलगांचा संताप, हलगर्जीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याची नातलगांची मागणी, अधिकारी अधिक तपास करून हलगर्जीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करणार का?

> आम्ही डॉक्टर नाशिककर यांच्याशी संपर्क साधला असता डॉक्टर जाधव शवविच्छेदनासाठी येणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र पूर्ण रात्र उलटल्यानंतरही डॉक्टर आले नाहीत. सकाळी डॉक्टर जाधव यांना वारंवार फोन करूनही प्रतिसाद मिळाला नाही. सुरुवातीला नऊ वाजता येतो असे सांगण्यात आले, त्यानंतर फोनच बंद लागला.
>
> –सनी गुलाब कांचन– नातलग, उरुळी कांचन

> उरुळी कांचन शहरीकरण वाढले आहे. उरुळी कांचन प्राथमिक आरोग्य केंद्राकडून नागरिकांना सुविधा मिळाव्या यासाठी मी अनेक वेळा वरिष्ठांकडे पाठपुरावा करत आहे. तसेच शव विच्छेदनाच्या बाबतीत मी स्वतः अनेक वेळा याबाबत वरिष्ठांकडे तक्रारी केल्या आहेत पण सुधारणा होत नाही. तरी संबंधित अधिकाऱ्यांनी रात्री अपरात्री आलेला मृतदेह ठेवण्यासाठी लागणारी सामुग्री द्यावी
>
> –संतोष आबासो कांचन- मा. जिल्हा नियोजन समिती सदस्य

## जुन्नर विधी सेवा समिती आयोजित - धोलवड गावात फिरते लोकअदालत व विधी जागृती शिबिर संपन्न

**जुन्नर (दै. संध्या)**

धोलवड ता. जुन्नर येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण पुणे, तालुका विधी सेवा समिती जुन्नर, जिल्हा व अति- सत्र न्यायालय जुन्नर यांचे संयुक्त विद्यमाने फिरते लोकअदालतीचे उद्घाटन निवृत्त जिल्हा न्यायाधीश ए. के. पटणी साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.




याप्रसंगी बोलताना, "न्याय आपल्या दारी" या संकल्पनेनुसार तालुका विधी सेवा समिती जुन्नर आपल्यापर्यंत पोहोचत आहे पक्षकारांनी मोबाईल व्हॅन लोक अदालतीच्या माध्यमातून आपली प्रलंबित प्रकरणे निकाली काढून आयुष्यातील महत्वाचा वेळ आणि पैसा वाचवावा असे आवाहन जिल्हा व अति सत्र न्यायाधीश श्री एस बी शेलार साहेब यांनी केले

या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी जुन्नर वकील बार असोसिएशन चे अध्यक्ष हेमंत हडवळे ॲड विश्वनाथ नलावडे ॲड आरती नलावडे ॲड शिवम नायकोडी ॲड राहुल मुंडे लोक अदालत पॅनल सदस्य ॲड निलम नलावडे ॲड अभिजीत तांबे जुन्नर तालुका विधी सेवा समिती समन्वयक श्री प्रशांत मोरतळे तसेच धोलवड गावचे प्रशासक श्री वैभव नलावडे ग्रामविकास ट्रस्ट चे अध्यक्ष ॲड कुलदीप नलावडे माजी सरपंच श्री शिवाजीराव नलावडे ग्रामसेवक श्री सोमनाथ आल्हाट पोलिस पाटील श्रीमती गौरी काळे गुलाब नलावडे जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष माजी तंटामुक्ती अध्यक्ष भगवान नलावडे गणपत नलावडे धोलवड गावचे ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते

फिरते लोक अदालतीमध्ये दिवाणी व फौजदारी दावे, दाखल पूर्व बँकेची वसुली प्रकरणे तडजोडी करिता ठेवण्यात आली होती दिवसभराच्या कामकाजात लोकन्यायालयाचे पॅनल मध्ये दोन्ही बाजूच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून व त्यांच्यामध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करुन , दोन दिवाणी दावा प्रकरणे आपसी समझोता व तडजोड करून निकाली काढण्यात आली. तसेच प्रलंबित व दाखलपुर्व प्रकणांतील एकूण रक्कम ४८,१८४ /- ची वसूली करण्यात आली.

या प्रसंगी विधी जनजागृती शिबिरामध्ये विविध विषयांवरती विधीज्ञांनी मार्गदर्शन केले. विधी जनजागृती शिबिर व फिरते लोकअदालत यशस्वी करण्याकरिता मा श्री एस बी शेलार साहेब जिल्हा न्यायाधिश जुन्नर, जुन्नर वकील बार असोसिएशन चे अध्यक्ष हेमंत हडवळे समन्वयक प्रशांत मोरतळे, धोलवड सरपंच प्रशासक श्री वैभव नलावडे यांचे मोलाचे योगदान लाभले.

## प्रत्येकामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे - रूपालीताई कांडगे

**चाकण (दै. संध्या)**

वाचाल तर वाचाल, हे ब्रीद सत्यात उतरवण्यासाठी प्रत्येकामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे, असे विचार महिला व बालकल्याण समितीच्या सभापती तथा नगरसेविका रूपालीताई कांडगे यांनी येथे व्यक्त केले.

येथील डॉ. केशव बळीराम हेडगेवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने चाकण नगरपरिषदेचे सर्व पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते आदींचा शाल, श्रीफळ, मानचिन्ह, पुष्पगुच्छ व पुस्तक देवून सन्मान करण्यात आला. त्यावेळी कांडगेताई बोलत होत्या. याप्रसंगी चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ, नगरसेवक रणजित जरे, विकास धाडगे, मंगेश कांडगे, जयश्री नायकवाडी, राहुल



कांडगे, आरती परदेशी, आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते अरुण साळुंके आदी उपस्थित होते.

रूपालीताई कांडगे पुढे म्हणाल्या," डॉ. हेडगेवार वाचनालयात स्पर्धा परीक्षेसह चौदा हजार पुस्तके आहेत, ही समाधानकारक बाब असून, या वाचनालयाचा नागरिकांनी लाभ घेतला पाहिजे. तरुण पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण होणे आवश्यक असून, सध्याच्या धावपळीच्या युगात मोबाईलचा अतिरेक टाळला पाहिजे." अरुण साळुंके यांनी प्रास्ताविक केले.

## सुपा पोलिसांचा सतर्कपणा : अवघ्या १२ तासांत हरवलेले सव्वा तोळ्याचे मंगळसूत्र शोधून महिलेस परत

**सुपा (दै. संध्या)**

मौजे सुपा, ता.बारामती, जि.पुणे येथे दिनांक १३/०६/२०२६ रोजी रात्री सुमारे ९.०० वा.पीडीसीसी बँक परिसरात शितल विकास टेमगिरे (रा. भरतगाव,ता.दौंड,जि. पुणे) यांचे गळ्यातील सव्वा तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र हरवले होते.याबाबत त्यांनी सुपा पोलीस स्टेशन येथे संपर्क साधून मदतीची विनंती केली.

सदर घटनेची माहिती मिळताच सुपा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांनी तत्काळ गुन्हे शोध पथकाला तपासाच्या सूचना दिल्या.त्यानुसार पोलीस कॉन्स्टेबल किसनराव ताडगे,पोलीस कॉन्स्टेबल महादेव साळुंखे व पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब चौधरी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली तसेच गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम सुरू केली.

सखोल तपास आणि



शोधकार्यादरम्यान सदर मंगळसूत्र एका महिलेस मिळून आल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर संबंधित महिलेकडून मंगळसूत्र ताब्यात घेऊन ते मूळ मालक शितल विकास टेमगिरे यांना सुपूर्द करण्यात आले.

हरवलेले सव्वा तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र, किंमत अंदाजे रु. १,५०,०००/- इतकी असून, अल्पावधीत शोधून दिल्याने शितल विकास टेमगिरे यांनी सुपा पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार,पोलीस उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड तसेच प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुपा पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस कॉन्स्टेबल किसनराव ताडगे, पोलीस कॉन्स्टेबल महादेव साळुंखे व पोलीस कॉन्स्टेबल भाऊसाहेब चौधरी यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणतीही मौल्यवान वस्तू हरवल्यास / सापडल्यास अथवा कोणतीही संशयास्पद व्यक्ती,वस्तू किंवा घटना निदर्शनास आल्यास तात्काळ सुपा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा.

## बळीराजाच्या जिव्हाळ्याचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार - विजयसिंह शिंदे

**चाकण (दै. संध्या)**

बळीराजाच्या जिव्हाळ्याचा प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागणार असून, महात्मा फुले मार्केट यार्डातील कोट्यवधी रुपयांच्या ऐतिहासिक विकास कामांचे भूमिपूजन व उदघाटन करण्यात आल्याने शेतकऱ्यांना आणि येथील ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे, असे स्पष्ट मत खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे यांनी येथे व्यक्त केले.



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्डातील शेळ्या - मेंढ्या बाजारात येणाऱ्या हजारो शेतकरी बांधवांना अनेक वर्षांपासून पायाभूत सुविधांची मोठी अडचण भासत होती. हा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून बळीराजाची मोठी सोय करण्यासाठी मार्केटयार्ड परिसरात विविध विकास कामांचा शुभारंभ बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे व खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक अशोक राक्षे, महेंद्र गोरे, अनुराग जैद, सागर मु-हे, सुधीर भोमाळे, सयाजी मोहिते, भरत कड, अल्ताफ कुरेशी, नानासाहेब जांभळे, कैलास घेनंद, सचिव बाळासाहेब धंदरे, सहाय्यक सचिव संतोष गायकवाड, उल्हास चांभारे आदी उपस्थित होते.

पाईपलाईनच्या आवश्यक कामांमुळे शेतकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. शेळ्या - मेंढ्या बाजारातील मोकळ्या जागेचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे चिखल व धुळीचा त्रास कायमचा संपून बळीराजाला स्वच्छ व हक्काची जागा मिळणार आहे. रोहकल रोडवरील पाईप लाईनचे काम तातडीने करण्यात येणार असून, पाण्याच्या सुविधेचा प्रश्न मिटणार आहे.

अल्ताफ कुरेशी व नानासाहेब जांभळे यांनी मनोगत व्यक्त केले. खेड बाजार समितीचे संचालक अनुराग जैद यांनी प्रास्ताविक केले. बाळासाहेब धंदरे व संतोष गायकवाड यांनी स्वागत केले. सुधीर भोमाळे यांनी आभार मानले.

